# प्रकरण चार

## सामान्य प्रशासन विभाग

### 4.1 जिल्हा ग्रामविकास निधीतून घेण्यात आलेल्या कर्ज वसूलीबाबत.

**पंचायत समिती कल्याण, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, कल्याणचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षात 19 ग्रामपंचायतींना सार्वजनिक विकास कामाकरीता जिल्हा ग्रामविकास निधीमधून एकूण रक्कम रुपये 4,16,79,000/- चे प्रदान करणेत आले असून त्यापैकी रक्कम रुपये 2,87,08,341/- इतकी वसूली थकीत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने सन 2014-15 वित्तीय वर्षात प्रलंबित कर्जावर व्याजाची आकारणी केली नाही.

2) पंचायत समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना नंबर 8 मध्ये मागणी नोंदविली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे परिशिष्टानुसार संबंधितास नोटीस दिली नाही.

### 4.2 जनसुविधा योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना दिलेल्या अनुदानाबाबत.

**पंचायत समिती कल्याण, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती कल्याणकडून सन 2014-2015 या वित्तीय वर्षात ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी रक्कम रूपये 3,84,42,682/- एवढे विशेष अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी रक्कम रूपये 1,17,10,000/- एवढे विशेष अनुदान कल्याण गटातील एकूण 21 कामांसाठी ग्रामपंचायतींना वितरीत केले आहे. तसेच रक्कम रूपये 2,67,32,682/- एवढा निधी पंचायत समिती स्तरावर अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्मशानभूमीकरीता प्राप्त रक्कम रूपये 3,84,42,682/- एवढया विशेष अनुदानापैकी रक्कम रूपये 1,17,10,000/- एवढेच अनुदान ग्रामपंचायतींना वितरीत केले असून उर्वरीत रक्कम रूपये 2,67,32,682/- एवढया मोठया प्रमाणात निधी पंचायत समिती स्तरावर विनावापर गुंतून पडला आहे. तरी सदर निधी वितरीत का करण्यात आला नाही याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) पंचायत समिती स्तरावरून वितरीत केलेल्या निधी मंजूर प्रयोजनासाठीच खर्च केल्याची खात्री संबंधित विभागाने करणे आवश्यक असून अनुदान विनियोगाचे दाखले, खर्चाची मूल्यांकने, काम पूर्णत्वाचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र इत्यादी अभिलेखे सादर करून अनुदान वितरणाचे खात्री करणे आवश्यक आहे.

3) ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केलेल्या निधीच्या खर्चाची प्रमाणके व उपप्रमाणके ग्रामपंचायत स्तरावर असल्याने खर्चाची सत्यता पडताळता आली नाही. तसेच निधी ज्या कामासाठी वाटप केला ती कामे पूर्ण झाली किंवा कसे याच्या खात्रीसाठी अनुदान खर्चाइतके मूल्यांकन विनियोगाचे प्रमाणपत्र उपलब्ध न केल्याने सदर अनुदान विनियोगाची खात्री झाली नाही.

4) वितरीत केलेला निधी ग्रामपंचायत स्तरावर पडून आहे किंवा कसे याची खातरजमा पंचायत समिती स्तरावरून केल्याचे दिसून येत नाही.

### 4.3 दलित वस्ती विकास सुधारणा योजनेंतर्गत खर्चाबाबत.

**पंचायत समिती कल्याण, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21)** - पंचायत समिती कल्याण, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे यांनी दलित वस्ती विकास सुधार योजनेंतर्गत रक्कम रुपये 89,38,559/- ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 19/01/2001 आणि 02/03/2009 अन्वये 5 टक्के रक्कम ग्रामनिधीत जमा करणे आवश्यक आहे. तरी सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करुन ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीत जमा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गो.ख/10/1001/ प्र.क्र.309/ख, मंत्रालय, मुंबई,दिनांक 11/02/2010 अन्वये बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजावर प्रती घनमीटर रुपये 200/- अथवा प्रती घनमीटर 70.68 प्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.जी.डी.2005/ प्र.क्र.324/इमारती 2, मंत्रालय, मुंबई, दिनांक 03/03/2006 अन्वये बाब क्रमांक 5 अन्वये अधिनियम अंतर्गत नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून करार किंमतीच्या 4 टक्के रक्कम मुल्यवर्धित कर वसूल करणे आवश्यक आहे. तसेच 1 टक्के कामगार विमा व 1 टक्के उपकराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4) अंदाजपत्रक आणि मुल्यांकन उपलब्ध न झाल्याने, झालेला खर्च योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम 97 व नियम 197 अन्वये नमुना 39/40 व नमुना 69 मध्ये इमारत / रस्ते / बांधकाम नोंदवहीत नोंदी घेतल्याचे आढळून आलेले नाही.

6) अनुदान वर्ग करण्यात आलेल्या ग्रामपंचायती कल्याण महानगरपालिकेकडे वर्ग झाल्यामुळे त्यांना देण्यात आलेल्या 13 कामांच्या बांधकामाच्या खर्चाची रक्कम पंचायत समितीने परत घेतली आहे. तरी सदर रक्कम जिल्हा परिषदेस जमा करण्यात आली किंवा कसे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

7) रक्कम रुपये 2,07,37,479/- खर्च न करण्याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.4 गोरेगाव ग्रामपंचायत, तालुका अंबरनाथ येथे कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधणे व अंतर्गत रस्ता तयार करणे. पंचायत समिती अंबरनाथ, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती अंबरनाथ, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे यांनी गोरेगाव ग्रामपंचायत, तालुका अंबरनाथ येथे कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधणे व अंतर्गत रस्ता तयार करणेकामी जनसुविधा योजने अंतर्गत गोरेगाव ग्रामपंचायतीस रुपये 10,00,000/- एवढी रक्कम अदा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक भाखंस-1088/2512/उद्योग/6/ख,दिनांक 02/01/1992 आणि महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक भाखंस-1093/2635/उद्योग/6/ख, दिनांक 16/07/1993 अन्वये सदर कामास जाहिर निविदेद्वारे प्रसिध्दी देण्यात आलेली नाही.

2) ग्रामपंचायत गोरेगाव यांच्याबरोबर करारनामा करण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/2099/ प्र.क्र.309/ख,दिनांक 11/02/2010 नुसार स्वामित्वधनाची वसुली करण्यात आलेली नाही.

4) कामाचे फोटो, ड्रॉइंग आणि सिमेंट वापराचा अहवाल नस्तीस नाही.

5) कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र नस्तीस दिसून आलेले नाही.

6) कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र नस्तीस दिसून आलेले नाही.

7) करण्यात आलेले बांधकाम हे भूकंप प्रवण क्षेत्रात असल्याने बांधकाम करतांना भूकंप रोधक काय उपाययोजना केली याचा तपशील नस्तीस नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र. 1864/53,दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याबाबतचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंबरनाथ यांचे प्रमाणपत्र नस्तीस नाही.

9) काम मे, 2015 मध्ये पूर्ण झालेले असतांना मार्च, 2015 मध्ये ग्रामपंचायतीस रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

कामास अदा करावयाची रक्कम रुपये 9,37,253/- असतांना ग्रामपंचायतीस रुपये 10,00,000/- एवढी रक्कम देण्यात आलेली आहे. जादा देण्यात आलेली रक्कम रुपये 8,447/- वसूल होणे आवश्यक आहे.

**4.5 ग्रामपंचायत केल्हे अंतर्गत नेवाडे येथील समाज हॉल दुरुस्त करणे.**

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18)** - पंचायत समिती भिवंडी, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांच्या सन 2014-2015 च्या ग्रामपंचायत केल्हे अंतर्गत नेवाडे येथील समाज हॉल दुरुस्त करणेच्या कामावर रुपये 99,780/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक भाखंस-1088/ 2512/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय क्रमांक, भाखस-1088/ 2535/उदयोग-6,दिनांक 16/07/1993 नुसार 50,000/- पेक्षा जास्त किमतीच्या बांधकामासाठी जाहीर निविदा प्रसिद्धी देण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक गौखनि-10/2099/ प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार स्वामित्वधनाची वसुली करण्यात आलेली नाही.

3) कामाचे फोटो नस्तीस नाही.

4) कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र नस्तीस दिसून आलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक 12/10/2000 नुसार मोजमापे दिनांकीत स्वाक्षरी नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक 20/05/1999 नुसार कामाच्या ठिकाणी नामनिर्देशीत फलक लावण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, दिनांक 09/02/2009 नुसार ग्रामपंचायत सदरचे काम करण्यास सक्षम असल्याबाबतचे गट विकास अधिकारी, यांचे प्रमाणपत्र नस्तीस नाही.

8) सदरचे काम दिनांक 29/11/2013 मध्ये पूर्ण झालेले असतांना 2 वर्ष विलंबाने ग्रामपंचायतीस रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

**4.6 जनसुविधा अंतर्गत प्रदान केलेल्या देयकाबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती मोखाडा, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समितीने विकास कामासाठी जनसुविधा योजनेमधून रक्कम रुपये 1,79,59,927/- इतकी प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 51(3) अन्वये कोणत्याही प्रवर्गाची बीले मिळाल्यानंतर परिनिरीक्षण करून संबंधीत तपासणी अधिकारी यांनी तरतूद व बील योग्य असल्याबाबत स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 व 50 (4) प्रमाणे प्रदान रक्कमांची पोचपावती घेणे व नियम 21 प्रमाणे दिलेल्या तारखा शक्य असेल तेव्हा नमूद करण्यात येतील, असे असताना ग्रामपंचायतीकडून नमुना नं. 7 च्या पावत्या घेण्यात आलेल्या नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 प्रमाणे पैसे त्वरित देणे आवश्यक असल्याशिवाय धनादेशावर सही केली जाणार नाही. तसेच नियम 31(1) (2) प्रमाणे धनादेश विहित मुदतीत पारित न झाल्यास रद्द करण्यात येईल, असे असताना ही विलंबाने धनादेश पारित केलेले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायती विकास कामापासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

**4.7 दलित वस्ती अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे (ग्रापं. खोच). (शासकीय निधी)**

**पंचायत समिती मोखाडा, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** ग्रामपंचायत, खोच यांनी दलित वस्ती अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे या कामावर रक्कम रुपये 50,000/- इतका खर्च केला असून सदर कामाचे मोजमाप नोंदवही उपलब्ध् केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 164 प्रमाणे मोजमाप पुस्तक हा महत्वाचा अभिलेख असून नियम 166 प्रमाणे मोजमाप नोंदवहीत कामाची मापे व इतर तपशिलांची नोंद करणे आवश्यक असताना तशी नोंदवही उपलब्ध नाही.

**4.8 ग्रामपंचायतीना जनसुविधा अंतर्गत कामासाठी विशेष अनुदान प्रदानाच्या योजनेबाबत**. (**शासकीय निधी**)

**पंचायत समिती पालघर, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक 2010/प्र.क्र.62/ पं.स.61, दिनांक 16/09/2012 नुसार ग्रामपंचायतीना जनसुविधेसाठी विशेष अनुदान देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली होती. पंचायत समिती, पालघरने 50 ग्रामपंचायतीच्या कामांना प्रशासकीय मंजुरीचे पत्र क्रमांक 191, दिनांक 13/12/2014 अन्वये दिलेले असून 25 ग्रामपंचायतीच्या नस्तीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील पत्र क्रमांक 63/15, दिनांक 20/03/2015 अट क्रमांक 14 नुसार माहे मार्च 2015 अखेर कोणत्याही परिस्थितीत कामे पूर्ण करण्याबाबत कळविले आहे. तसेच अट क्रमांक 19 नुसार ग्रामपंचायतीनी सदरचे काम विहित कालावधीत पूर्ण न झाल्यास अखर्चित निधी शासनास परत करणेबाबत कळविले आहे. पंचायत समितीचे प्र.क्र. 333,दिनांक 30/03/2015 नुसार अनुदानाची रक्कम रुपये 1,33,75,000/- खर्च दर्शवून (50 टक्के) ग्रामपंचायतीना वाटप केले आहे. तसेच प्रमाणक क्रमांक 643, दिनांक 31/03/2015 नुसार रक्कम रुपये 44,58,432/- खर्च नोंदवून अनुदानाचे (40 टक्के) वाटप केले आहे. परंतु सदरच्या निधीचा धनादेश लेखापरीक्षण तारखेपर्यंत (दिनांक 28/09/2015) वाटप केलेला नाही. मार्च 2015 अखेरपर्यंत ग्रामपंचायतीनी कामांना सुरुवातही झालेली नसल्याने व कामे पूर्ण झालेली नसताना अखर्चित निधीची रक्कम रुपये 1,78,33,333/- शासनास परत का केली नाही.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील पत्र क्रमांक 63/15, दिनांक 20/03/2015 अट क्रमांक 19 नुसार निधीचा पहिला खर्च झाल्यानंतर 40 टक्के दुसरा हप्ता ग्रामपंचायतीना द्यावयाचा असताना पंचायत समितीने ग्रामपंचायतीच्या कामाच्या प्रगतीनुसार निधीचे वितरण करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) माहे मार्च 2015 अखेर कामे पूर्ण झाल्यानंतर कामाचे मोजमाप पुस्तक, काम पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाहीत.

**4.9 ग्रामपंचायत विभागात प्राप्त झालेले अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती महाड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती महाड येथील ग्रामपंचायत विभागास प्राप्त झालेले अनुदान उदा. मुद्रांक शुल्क जकात कर कर्मचारी किमान वेतन अनुदान गौण खनिज मुद्रांक शुल्क अनुदान इत्यादीमधून हात पंप वर्गणी परस्पर कपात केली व नमुना नं.7 ची पावती देण्यात आली नाही.

2) पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक 2610 दिनांक 18/08/2010 नुसार निकर्षानुसार कार्यवाही करून वृक्षसंरक्षण केल्याचे अभिलेखे व अखर्चित राहिलेली रक्कम याबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नाही. व विनियोग खर्चाची खात्री करता आली नाही.

3) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक व्हीपीएम-2009/प्र.क्र.125/पं.रा.3, दिनांक 27/07/2009 अन्वये एक वर्षात जास्तीत जास्त बारा बैठकीपुरताच सदस्य बैठक भत्ता मर्यादित आहे. परंतू बारा बैठका झाल्याची आवश्यक अभीलेख्याअभावी खात्री करता आली नाही.

**4.10 टँकर खर्चाबाबत अनियमितता.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 15, दिनांक 15/07/2014 ने रक्कम रुपये 2,880/- श्री.डी.पी.सकपाळ यांना अतिकालिक भत्ता प्रदान केला आहे. परंतु, ते ज्या विभागात काम करतात, त्या विभागाचे नादेय प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही. टँकरचे लॉगबुक पडताळणीसाठी प्राप्त झाले नाही.

2) प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 15/07/2014 ने रक्कम रुपये 7,980/- श्री.डी.पी.सकपाळ यांना प्रदान केले आहेत. वरील प्रमाणक क्रमांक 15 व प्रमाणक क्रमांक 16 ने रक्कम अनुक्रमे रुपये 2,880/- व 7,980/- दिनांक 06/05/2014 ते 14/06/2014 या एकाच कालावधीचे श्री.डी.पी.सकपाळ यांना प्रदान केले आहेत. दोन्ही अतिकालिक भत्ता असल्याचे दिसते. याबाबत मंजूर दैनंदिनी, टँकर पाणी पुरवठ्याच्या पोहोच पावत्या, साक्षीदार सह्या इत्यादी अभिलेखे पडताळणीसाठी प्राप्त झालेले नाहीत.

3) गाडी क्रमांक MTD-7542 संदर्भात लॉगबुक पडताळणीसाठी प्राप्त झाले नाही. डिझेल खरेदीचे रक्कम रुपये 6,843/- ची विनायक ऑटोमोबाईल्स, शृंगारतळी यांची व्हॅट पावती सोबत जोडलेली नाही. तथापि, साधी पावती आहे.

4) प्रमाणक क्रमांक 19, दिनांक 15/07/2014 अन्वये रक्कम रुपये 4,980/- टँकर दुरुस्तीसाठी प्रदान केलेली आहे. परंतु दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार दरपत्रके मागविलेली नाहीत.

5) श्री.रोशन यादव, टँकर मदतनीस यांचा हजर अहवाल दिनांक 03/05/2014 चा असून तो पंचायत समितीमध्ये आवक क्रमांक 4176 दिनांक 07/05/2014 ने प्राप्त झाल्याचे दिसते. तसेच, गटविकास अधिकारी यांचा नेमणूक आदेश दिनांक 10/05/2014 चा आहे. म्हणजेच, नेमणूक आदेश दिनांक 10/05/2014 चा असतांना श्री.रोशन यादव यांना दिनांक 03/05/2014 पासून हजर कसे दाखवले, याबाबत खुलासा करावा. MTD-7542 टँकरचे आर.सी. बुक व क्षमता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही. तसेच, टँकर केव्हा अधिग्रहीत केले, त्याबाबतची कागदपत्रे लेखा परिक्षणास प्राप्त झाली नाहीत.

### 4.11 विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी दैनंदिनी उशिराने सादर केलेबाबत.

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विस्तार अधिकारी (ग्रा.पं., कृषी, वि.घ.यो.) यांनी दैनंदिनी विलंबाने सादर केल्या आहेत.

2) दरमहा उद्दिष्टाप्रमाणे तपासणी केल्याचे दिसत नाही.

3) संभाव्य फिरती दौरा सादर केलेला नाही.

4) ग्रामपंचायत अंजनवेल, वेलदूर, साखरी बु. यांची मोठ्या प्रमाणात थकबाकी असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसत नाही. तसेच रुपये 79,29,945/- इतके अनुदान देय नसतांना नियमबाह्यपणे अनुदानाच्या रकमा वर्ग केल्या आहेत.

### 4.12 जाहीर निविदा न मागविता संगणक खरेदीबाबत.

**पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी यांनी महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088(2512)/उद्योग 6, दिनांक 02/01/1992 व महाराष्ट्र शासन, भांखस 2002(2990) उद्योग-6, दिनांक 04/02/2003 तसेच, उद्योग संचालक यांचे परिपत्रक क्रमांक 3 सं/शा.नि.म.शा.व ख/परिपत्रक 2009/बी 15279, दिनांक 03/06/2009 मध्ये नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करुन जाहीर निविदा मागवून संगणक खरेदी करणे आवश्यक असतांना स्थानिक स्तरावर तीन कोटेशन (दरपत्रके) मागवून खरेदी केलेली आहे. (एकूण रुपये 3,79,000/-).

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088(2512)/उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.4 (परिशिष्ठ 8) नुसार साहित्याची तांत्रिक तपासणी शासनाच्या कार्यालयाकडून घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) शासनमान्य दरकरार उपलब्ध नसल्याबाबत उद्योग उर्जा विभाग अथवा मेडा यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) संगणक खरेदीबाबतचे प्रथम कार्यादेश डिसेंबर 2014 मध्ये दिलेले असतांना दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार पुनर्प्रत्ययी आदेश न देता पुन्हा जानेवारी/2015 मध्ये कोटेशन मागविण्याचे कारण काय आहे.

**4.13 मर्यादेपेक्षा जादा वाहन वापराबाबत.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग सन 2014-15 (परिच्छेद क्रमांक 8) -** सभापती यांनी मर्यादेपेक्षा जादा दिवस वाहन फिरती केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1**)** महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.132/पंरा-1 बांधकाम भवन, 25 मर्झबान पथ फोर्ड मुंबई, दिनांक 10/07/2014 नुसार सभापती व उपसभापती यांना अनुक्रमे 20 दिवस व 10 दिवस असे प्रत्येक महिन्याच्या 30 दिवसांपर्यंत पंचायत समिती क्षेत्रात विकास कामांवर देखरेख ठेवण्यासाठी वाहन खरेदी उपलब्ध करुन दयावे असे असतांना सभापती यांनी 20 दिवसांपेक्षा जादा दिवस गाडी वापरलेली आहे. **(**वाहन क्रमांक एम्. एच.07 जी 2081**)**

**4.14 गरीबांची घरे सुस्थितीत ठेवणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15)** - गरीबांची घरे सुस्थितीत ठेवणेबाबत प्रमाणक क्रमांक 6, दिनांक 20/03/2015 रक्कम रुपये 42,000/- खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) घरदुरुस्तीबाबत लाभार्थ्यांचे मुद्रांक पेपरवर संमती घेतलेली नाही.

2) घराचा 7/12 उतारा दुरुस्ती पूर्वीचा व दुरुस्तीनंतरचा उपलब्ध झालेला नाही.

3) घर दुरुस्त झाल्याबाबत ग्रामपंचायतीचा दाखला उपलब्ध झालेला नाही.

4) घरदुरुस्ती केल्याबाबतचा लाभार्थीचा घरासोबतचा फोटो नाही.

5) घराचा नमुना नंबर 8 अ चा उतारा उपलब्ध झालेला नाही.

**4.15 ग्रामपंचायत प्रलंबित अपहार प्रकरणे.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग ग्रामपंचायत विभागाचे लेखे तपासले असता ग्रामपंचायत अपहार प्रकरणाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कुडाळ पंचायत समिती ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर प्रकरणातील दिनांक 31/03/2015 अखेर ग्रामनिधी 23 व जवाहर रोजगार योजना / संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना 11 अशी एकूण 34 प्रकरणे असून एकूण रक्कम रुपये 1,41,24,540/- संबधीत सरपंच व ग्रामसेवक यांचेवर जबाबदारी निश्चित करुन वसुली करावी. प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत.

**4.16 ग्रामपंचायतीच्या थकित कराबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती वेंगुर्ला कडील घरपटटी वसुलीची नोंदवही तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) थकित कराची रक्कम रुपये 11,49,124/- वसुल करुन अनुपालन सादर करावे. एकूण ग्रामपंचायती 30 असून त्यांचे करमुल्य वेगवेगळे आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने सुधारीत दराने करमुल्य निर्धारण केले नसेल त्यांना तातडीने पूर्वलक्षी प्रभावाने सुधारीत करमुल्यासाठी आदेश दयावेत व नोंदवही ठेवण्यात यावी.

**4.17 मागासवर्गीय लाभार्थ्यांना जुने घर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य देणेबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग चे सन 2014-2015 चे लेखे तपासले असता जुने घर दुरुस्तीबाबत एकूण लाभार्थी 10 असून खर्च रुपये 2,50,000/- झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकिय मंजुरी आदेशावर जावक क्रमांक नोंद नाही.

2) ग्रामपंचायतीला अनुदान प्राप्त झाल्याबाबत नमुना नंबर 7 ची पावती व उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

3) लाभार्थीनिवडीबाबतग्रामसभा ठराव जोडलेले नाहीत.

उदा. अ) हनुमंत नागाप्पा कु-हाडे ब) काळू अर्जुन जाधव क) राजाराम चिंतामणी जाधव.

4) घर दुरुस्तीनंतरचे फोटो उपलब्ध नाहीत.

5) घरदुरुस्ती कामाचे मुल्यांकन दाखले नस्तीसोबत जोडलेले नाहीत.

6) लाभार्थ्यांचे गाव निहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे दुबार लाभ घेतला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**4.18 गरीबांचे घरे सुस्थितीत ठेवणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदर योजनेवर पंचायत समिती वैभववाडी यांनी रक्कम रुपये 1,40,000/- इतका खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेड पी अे/2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमुद योजना वेळापत्रकानुसार राबविलेली नाही. तसेच ग्रामपंचायत स्तरावर अनुदान पोहोच झालेबाबत नमुना नंबर सातच्या पावत्या दप्तरी उपलब्ध नाहीत.

2) शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55/34,दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थ्यांना दुबार लाभ टाळण्यासाठी मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

3) काम पूर्णत्व व अनुदान विनियोग दाखले उपलब्ध झाले नाहीत.

4) उपअभियंता (बां) यांच्या मुल्यांकनानंतर अंतिम देयक लाभार्थ्यास अदा करणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीने तसे केलेले नाही.

5) गरिबांची घरे सुस्थितीत ठेवणे योजनेअंतर्गत दाखल प्रस्तावांची स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही.

6) सदर योजनेचे अनुदान प्रत्यक्ष लाभार्थ्यांना मिळालेबाबतची पोहोच उपलब्ध झाली नाही.

**4.19 ग्रामसेवकांना नियमबाहय जादा ग्रेड वेतन लागू केलेबाबत.**

**पंचायत समिती पेठ, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिएसआर-2009/प्र.क्र61/आस्था-5, दिनांक 20/05/2009 अन्वये जिल्हा परिषदेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील कर्मचा-यांसाठी दिनांक 01/01/2006 पासून सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार ग्रामसेवक संवर्गास रुपये 5,200-20,200 ग्रेड वेतन रुपये 2,400/- आणि 7 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर रुपये 5,200-20,200 ग्रेडवेतन रुपये 2,800/- ही वेतन संरचना मंजूर करण्यात आली आहे. परंतु ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिएसआर-2013/प्र.क्र30/आस्था-5, दिनांक 09/09/2014 अन्वये 7 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर ग्रेडवेतन रुपये 2,800/- अनुज्ञेय करण्याची तरतूद रदद करण्यात आली आणि ग्रामविकास अधिकारी या संवर्गास वेतनश्रेणी रुपये 5,200-20,200 ग्रेडवेतन रुपये 3,500/- ही वेतन संरचना मंजूर करण्यात आली. परिणामी ग्रामसेवक संवर्गास दिनांक 01/10/2014 पासून ग्रेड वेतन रुपये 2,400/- अनुज्ञेय ठरते. असे असतांना दिनांक 01/10/2014 पासून उक्त 51 ग्रामसेवक यांना नियमबाहय पध्दतीने दिनांक 01/10/2014 ते 31/01/2015 या कालावधी रुपये 2,800/- ग्रेडवेतन प्रदान केलेने रूपये 1,77,072/- आणि

दिनांक 01/02/2015 ते 31/08/2015 या कालावधीत रुपये 3,500/- ग्रेडवेतन प्रदान केल्यामुळे रूपये 8,52,159/- एवढया वेतन व भत्ते यांचे अतिप्रदान झालेले आहे. सदरची रक्कम संबंधिताकडून वसुल करण्यात यावी.

**4.20 ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर प्रकरणांबाबत.**

**पंचायत समिती मालेगांव, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, मालेगावचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात, ग्रामपंचायतीमधील ग्रामनिधी आणि जवाहर रोजगार योजनेतील अफरातफर प्रकरणाविषयी खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामनिधी एकूण 42 प्रकरणे अपहारीत रक्कमेची आहेत. एकूण रुपये 30,79,335/- एवढी रक्कम अपहारीत दर्शविलेली असुन चौकशी होऊन रुपये 23,37,580/- एवढी वसुली झालेली आहे. रुपये 7,41,755/- एवढी रक्कम वसुल करणे बाकी आहे.

2) जवाहर रोजगार एकूण 11 प्रकरणे अपहरित रक्कमेची आहे. त्यात एकूण रुपये 6,03,285/- एवढी अपहारित रक्कम दर्शविलेली आहे. त्यात चौकशी होऊन रुपये 2,40,058/- एवढी वसुली झालेली आहे. रुपये 3,63,227/- एवढी रक्कम वसुल करणे बाकी आहे.

3) पंचायत समिती स्तरावरील अफरातफर नोंदवही यांचा मेळ घेतल्याचे दिसून आलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंचायत राज समिती 2005/प्र.क्र.262/पंचायत राज समिती,दिनांक 03/09/2005 नुसार तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जेईल-2006/प्र.क्र.771/आस्था.12,दिनांक 28/09/2006 नुसार अपहाराची रक्कम वसुल करणे व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि, उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणात वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणांमधील अपहारीत रक्कम वसुल न झाल्याने संबंधित ग्रामपंचायतीचे व शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले असून उचित कार्यवाही करावी.

**4.21 पंचायत समिती कार्यालयात CCTV Camera बसविणेबाबत.**

**पंचायत समिती येवला, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती कार्यालयात CCTV Camera बसविणे साठी प्रमाणक क्रंमाक 4,दिनांक 30/07/2014 रूपये 90,190/- एवढा खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखास-1088/ (2512) उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (फ) नुसार रुपये 50,000/- किंवा त्यापेक्षा जास्त खरेदी करावयाची असल्यास महाराष्ट्र राजपत्रात तसेच राज्यस्तरीय दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक असतांना अशी खरेदी प्रक्रीया न राबविता साहित्याची खरेदी स्थानिक स्तरावर दरपत्रके मागवून खरेदी केलेने स्पर्धात्मक दरातील चढाओढीचा लाभ मिळू शकलेला नाही.

2) पुरवठादाराने पुरविलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ताबाबत व पुरविलेले साहित्य आय एस आय मार्क तसेच नामाकिंत कंपनीचे दिसुन येत नाही. त्यामुळे पुरविलेले साहित्य वाजवी दराचे असल्याचे लेखापरीक्षणात अभिप्राय देता येत नाही.

4) पुरवठादाराचे दरकरार नसल्यामुळे विक्रीकर विभागाकडे नोंदणीकृत आहे किंवा कसे याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र दिसुन येत नाही. त्यामुळे सदर साहित्यावर मुल्यवर्धीत कर शासनास भरणा झाला किंवा कसे हे दर्शवावे.

5) सदरच्या साहित्याच्या नोंदी जडसंग्रह नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

**4.22 सेवाप्रवेशोत्तर परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झालेबाबत.**

**पंचायत समिती त्रयंबकेश्वर**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, पत्र क्रमांक एपीटी/1992/1593/सीआर/738/13, दिनांक 23/11/1992 अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम 1985 अस्तित्वात आल्याचा दिनांक 20/01/1986 रोजी जे जिल्हा परिषद कर्मचाऱ्याची 15 वर्ष सलग सेवा पूर्ण करतात. त्यांनी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणेपासुन सूट मिळणेकरीता अर्ज केला असेल. त्यांना सूट मिळालेखेरीज वेतनवाढी सुरु करु नयेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद (सेवाप्रवेश) नियम 1967 व वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयानुसार जे कर्मचारी विहीत मुदतीत सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत त्यांची वेतनवाढ रोखने आवश्यक आहे. मुळ अहवालात नमूद कर्मचारी यांना वेतन वाढी दिल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाची परिगणना करुन वसुली करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे. तसेच या व्यतिरिक्त इतर सर्व कर्मचा-यांचे सेवा पुस्तकाची पडताळणी करुन जे कर्मचारी विहित मुदतीत सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण नाही. त्यांचे बाबतीत वरील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

**4.23 पंचायत समिती सेस फंडातून शेतक-यांना 50 टक्के अनुदानाने नॅपसॅक स्प्रेपंप वाटपबाबत (सेस फंड).**

**पंचायत समिती शिरपुर, जिल्हा धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती शिरपुर यांनी पंचायत समिती सेस फंडातून शेतक-यांना 50 टक्के अनुदानाने नॅपसॅक स्प्रेपंप रक्कम रुपये 2,99,409/- रुपये खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला असतांना त्यानुसार योजना राबविविलेली नाही. नियोजना अभावी तांत्रिक मंजुरीतील शर्ती अटीनुसार प्रथम मागणी करणा-या लाभार्थीस प्रथम तत्त्वावर वाटप असे नमूद असतांनाही एकुण 473 नॅपसॅक स्प्रेपंप पैकी 50 लाभार्थ्यांना वाटप झाल्याचे दिसुन येते व 423 नॅपसॅक स्प्रेपंप वाटप होणे बाकी आहे. म्हणजेच नियोजन कालावधी निश्चित न केल्यामुळे व लाभार्थी निवड न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

2) ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्र.क्र.597/34, दिनांक 05/10/1989 व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक पंरास/1098/प्र.क्रं 73/34, दिनांक 20/10/1999 नुसार सर्व योजनांतर्गत लाभ दिला जाणाऱ्या लाभार्थींची गावनिहाय मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 अन्वये प्रमाणकाच्या पृष्ठभागावर साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक नोंदवुन प्रमाणपत्र नोंदवणे आवश्यक होते, तथापि तशी कार्यवाही केलेली नाही.

4) स्टॉकबुक नोंदवहीवरील वाटपानुसार 473 नॅपसॅक स्प्रेपंप पैकी 50 लाभार्थींना वाटप झाल्याचे दिसुन येते व 423 नॅपसॅक स्प्रेपंप वाटप होणे बाकी आहेत. लाभार्थी निवड निश्चित न केल्यामुळे उपकरातुन खर्च नोंदविण्यात आलेला असुन रक्कम गुंतविण्यात आली आहे.

5) संबंधित पुरवठादाराचा उपप्रमाणक क्रमांक व दिनांक निरंक आहे. त्यामुळे साहित्य पुरवठा झाल्याचा कालावधी अवगत झाला नाही. विहित कालावधीत पुरवठा झाल्याची खात्री करता आली नाही.

6) देयकातुन आयकराची कपात केलेली नाही.

7) कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रं.सीसीएस/सुकृऔ/दरनि/2013-14/ 152/गु.नि.-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 4 अन्वये 90 टक्के रक्कम प्रथमत: साहित्य प्राप्तीनंतर अदा करावी व उर्वरीत 10 टक्के रक्कम 30 दिवसानंतर गुणवत्ता अहवाल व पुरवठा पश्चात क्षेत्रीय स्तरावरुन रॅन्डम पध्दतीने काढलेल्या नमुन्यांच्या गुणवत्ता अहवाल प्राप्त झालेनंतर करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.24 विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत) हे त्या पदास नेमुन दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसल्याबाबत.**

**पंचायत समिती धडगाव, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रंमांक संकिर्ण-1096/प्र.क्रं.155/ 21अ, दिनांक 27/06/1996 नुसार विस्तार अधिकारी यांनी त्यांना नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रातील किमान 10 ग्राम पंचायतीचे सखोल निरीक्षण प्रत्येक महिन्यात करुन त्या संदर्भातील एकत्रित वार्षिक अहवाल जिल्हा परिषदेर्मात विभागीय आयुक्तांकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु तसा अहवाल पाठविण्यात आलेला नाही.

**4.25 ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणाबाबत.**

**पंचायत समिती भुसावळ, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती भुसावळ अंतर्गत दिनांक 31/03/2015 अखेर ग्रामपंचायतीमधील ग्रामनिधी / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना / संपुर्ण ग्रामिण रोजगार योजनांमधील अफरातफरीच्या एकूण 19 प्रकरणांमध्ये रुपये 14,73,919/- इतकी रक्कम प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक पंरास/2005/ प्र.क.262/पंरास, दिनांक 03/09/2005 नुसार ग्रामनिधी/जरोयो/जग्रारोयो/संग्रारोयो/ या योजनेची 19 प्रकरणांमध्ये अफरातफरीची एकूण रक्कम रुपये 14,73,918/- संबधिताकडुन वसुल करणेत यावी.

**4.26 ग्रामपंचायत कडील अफरातफर प्रकरणातील वसुलीबाबत.**

**पंचायत समिती जामनेर, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती जामनेर अंतर्गत दिनांक 31/03/2015 अखेर ग्रामपंचायत अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये रक्कम रुपये 33,00,425.89 प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा अधिनियम 1961 चे नियम 19 अन्वये ग्रामनिधी/ जरोयो/जग्रासंयो/संग्रारोयो/या योजनेमध्ये, निघालेल्या अफरातफरीची एकूण रक्कम रुपये 33,00,425.89 संबधितांकडुन वसुल करणेत यावी.

**4.27 ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणाबाबतबाबत.**

**पंचायत समिती बोदवड, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, अंतर्गत ग्रामपंचायतींकडे दिनांक 31/03/2015 अखेर ग्रामनिधी / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्राम समृध्दी योजना व संपूर्ण ग्रामिण रोजगार योजनेची एकूण 31 अफरातफर प्रकरणात रक्कम रुपये 22,62,700/- गुंतून पडून आहे.

1) पंचायत समिती विस्तार अधिकारी यांनी परिपुर्ण दप्तर तपासणी केली नसल्याने नमुद अपहार प्रकरणांबाबत कार्यवाही सुरु, चौकशी अभावी प्रलंबीत, वसूली सुरु असल्याचे दर्शविले आहे. याबाबत विस्तार अधिकारी यांची अकार्यक्षमता स्पष्ट होते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2005/प्र.क्र.262/पंरास, दिनांक 03/09/2005 नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व सबंधितांकडून फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे परंतू बहुतांशी अपहार अथवा गैरव्यवहार प्रकरणांबाबत शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

वरील अपहारीत रकमा वसूल न झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

3) सेवा निवृत्त / मयत कर्मचा-यांचे बाबतीत त्यांचेकडे कोणतीही शासनाची रक्कम थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र (एन.ओ.सी.), नादेय दाखले रकमा वसूलीबाबत कार्यवाही न करता देण्यांत आलेले आहे. सेवानिवृत्तीचे वेळीच त्यांना देय असलेल्या रक्कमेमधून वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**4.28 लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मूलभुत सुविधांचे कामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती भोर यांना, लोक प्रतिनिधींनी सुचविलेली कामे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये 20,00,000/-अनुदान प्राप्त आहे. त्यापैकी रक्कम रुपये 15,00,000/- अनुदान वाटप करण्यात आले असुन रुपये 5,00,000/- अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/ प्र.क्र.18/वित्त 9(33), दिनांक 30/06/2004 व क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त 9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामे ग्रामपंचायतीला देण्याबाबत आर्थिक स्थिती सक्षमतेबाबतचे प्रमाणपत्र, ठराव, मागणी अर्ज आदी कागदपत्रे नस्तीसोबत उपलब्ध नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्रशाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. बांधकामास सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आवश्यक आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5,दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सिमेंटची चाचणी तसेच परिपत्रक क्रमांक एसटीआर/1097/ प्र.क्र.106/सांबा,दिनांक 09/02/1998 नुसार काम सुरु होण्यापूर्वी डांबराची चाचणी व कामावर वापरण्यात येणा-या वाळू, खडी, मुरूम यांची चाचणी शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून करुन घेवून अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 चे नियम 59 (1) नुसार नमुना 20 (क) मध्ये मोपमाप पुस्तिकेत तपशिलवार नोंदी नाहीत. शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक अंमल/2591/ प्र.क्र.262/52/जरोयो-5, दिनांक 18/10/1991 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार सर्व नोंदी वेळच्या वेळी घेऊन मोजमाप पुस्तिका अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील ॲपेडिंक्स 24 नुसार मोजमाप पुस्तिकेची उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. उप अभियंता / कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीचा मुल्यांकन दाखला आवश्यक आहे.

5) मुंबई गौणखनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 18.22 व 22 / अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0206/प्र.क्र.57 ख,दिनांक 11/02/2010 नुसार दर प्रति घनमिटर रुपये 70.67 प्रमाणे गौणखनिज स्वामित्वधनाच्या दरानुसार स्वामित्वधन वसूल करणे आवश्यक आहे.

6) विकास कामे ही शासनाच्या / ग्रामंपचायतीच्या जागेवर करणे आवश्यक आहे**.** सदर जागेचे सात / बारा उतारे, नमुना क्रमांक 8 उपलब्ध करणे आवश्यक आहे.

7) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए / 2009 / प्र.क्र.108 / कामगार 7-अ,दिनांक 17/6/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकराची रक्कम रुपये 20,000/- कपात करणे अनिवार्य आहे.

8) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं-1098/प्र.क्र.29/98,दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय कमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पं.रा.8 (35),दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापूर्वी ठेकेदाराने कामाचा व कामावरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे.

9) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दिनांक 01/07/2010 पासून ठेकेदार व उपठेकेदारास एकावेळी प्रदान रुपये 30,000/- व वार्षिक प्रदान रुपये 75,000/- असेल तेव्हा अनुक्रमे 2 टक्के (संस्थात्मक) व 1 टक्के (वैयक्तिक नावे) या दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. दिनांक 01/07/2010 पूर्वी ठेकेदार व उपठेकेदारास प्रदान रुपये 20,000/- व वार्षिक प्रदान रुपये 50,000/- असेल तेव्हा 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रुपये 40,000/- कपात करणे अनिवार्य आहे.

10) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय बीडीजी/2005/प्र.क्र.324/इमा.2,दिनांक 03/03/2006 मधील मुद्दा क्र. 4 नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून अधिसूचना क्रमांक

व्हीएटी-1505/सीआर13/कराधन-1, दिनांक 01/04/2005 नुसार दिनांक 01/04/2005 पासून 2 टक्के व अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून 4 टक्के मूल्यवर्धित कर वसूल करावयाचा आहे. तसेच अधिसूचना क्रमांक जेओ (एचक्यु)/व्हीएटी/2005/97,दिनांक 04/04/2012 नुसार दिनांक 01/04/2012 पासून मूल्यवर्धित कर 5 टक्के रक्कम कपात करणे अनिवार्य आहे.

11**)** अनुदान वाटप आदेशानुसार सदरची कामे ही दिनांक 31/03/2015 पूर्वीच पूर्ण करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 3**,**00**,**000/- व रुपये 2**,**00**,**000/- ही अखर्चित असलेली रक्कम शासनास वर्ग करणे आवश्यक आहे**.**

### 4.29 13 वा वित्त आयोगातून संगणक व प्रिंटर खरेदी मधील अनियमिततेबाबत

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती भोरचे सन 2014-2015 मध्ये 13 वा वित्त आयोग निधीतून क्लासी कॉम्प्युटर पुणे यांचे कडून संगणक व प्रिंटर खरेदी केले असुन एकूण रक्कम रुपये 1,07,319/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2010/ 275/प्र.क्र.172/421-7,दिनांक 19/10/2011 मधील परिच्छेद 1 अनुसार राज्य शासनाने वा केंद्र शासनाने ज्या ज्या वस्तु व सेवासाठी दरकरार केलेले आहेत, अशा वस्तु व साहित्याची शासनाच्या सक्षम यंत्रणेकडुन विहित कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी करुन घेणे आवश्यक असतांना शासकीय सक्षम यंत्रणेकडून तांत्रिक तपासणी केल्याचा अहवाल उपलब्ध नाहीत. तथापि, उपरोक्त संगणक व प्रिंटर खरेदीचे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आदेश व तपासणी अहवाल उपलब्ध झाले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग वित्तीय अधिकार नियम 1978 व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15/05/2009 नुसार रक्कम रुपये 50,000/- वरील खरेदीस तांत्रिक मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,पुणे यांची घेणे आवश्यक असताना सदर खरेदीच्या टिपणीची पडताळणी करता गट विकास अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेतली आहे व मंजुर टिपणीवर दिनांक नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक तेवीस 2011/ प्र.क्र.42/वित्त-4,दिनांक30/04/2011मधील अ.क्र.8(ब) नुसार शासन दर करारातील अटी नुसार लीनोव्हो कंपनीचे संगणक व कॅनन कंपनीचे प्रिंटर शासनाचे दर करारानुसार खरेदी करावयाचे असताना क्लासी कॉम्प्युटर पुणे यांचे नाव शासन दरकरारात नमूद नसताना त्यांचेकडून संगणक व प्रिंटर खरेदी केले आहेत.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1007/प्र.क्र.27/कोषा/-प्र.5, दिनांक 20/03/2007 नुसार 15 फेब्रुवारी किंवा त्यानंतर संगणक व प्रिंटर खरेदीच्या प्रस्तावास मंजुरी देऊ नये असे असताना माहे मार्च मध्ये नियमबाह्यपणे संगणक व प्रिंटर खरेदी केले आहेत.

5) उपरोक्त संगणक व प्रिंटर खरेदीची मूळ बिले नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे खरेदीची सत्यता पडताळता आली नाही.

### 4.30 13 वा वित्त आयोगातुन 100 टक्के अनुदानातुन जि.प.प्रा.शाळा केंजळ येथील सौर विद्युत निर्मिती प्रकल्प व त्यामधील अनियमितता.

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 68) -** पंचायत समिती भोर, सन 2014-2015 मध्ये 100 टक्के अनुदानावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंजळ येथे ग्रीन कनेक्टेड सौर विद्युत निर्मिती प्रकल्प राबविला असुन, सदर कामाचा पुरवठा ओदश जी.के.एनर्जी मार्केट्स. प्रायवेट लिमिटेड, पुणे यांना देण्यात आला असुन त्यासाठी रक्कम रुपये 2,97,500/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्रं.456/वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील "परिशिष्ट इ" नुसार योजनेचे वेळापत्रक ठरवून दिलेले असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./ 1080/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तसा अहवाल प्राप्त झाला नाही.

3) माल पुरवठा चलन नस्ती सोबत नाही. त्यामुळे सोलर पॉवर विद्युत निर्मिती संच कधी प्राप्त झाले याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

4) पंचायत समिती भोर यांचा पुरवठा आदेश जा.क्र.वशी/कृषी/485/2015 भोर दिनांक 21/03/2015 मधील अटी नुसार सौर पथ दिवे स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याबाबत चाचणी प्रमाणपत्र व अहवाल दप्तरी नाही.

5) साठा नोंदवहीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंजळ यांना सोलर पॉवर विद्युत निर्मिती संच वाटप केले आहेत त्याचा व प्राप्त दिनांक नमूद नाही.

6) संबंधित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंजळ यांच्या साठा नोंदवहीत सोलर पॉवर विद्युत निर्मिती संचाची नोंद घेऊन त्याची सत्य प्रत प्राप्त करून व सोलर पॉवर विद्युत निर्मिती संच सुव्यवस्थीत कार्यरत असलेबाबत प्रमाणित केलेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38,दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थ्यांच्या निवडीच्या निकषावर लाभार्थ्यांकडून सादर झालेली कागदपत्रे यांची काळजीपूर्वक छाननी प्रत्येक स्तरावर होणे गरजेचे आहे. ठरविलेल्या निकषांमध्ये न बसणारा लाभार्थी निवडणे किंवा प्रस्तावित करणे ही गंभीर अनियमितता समजली जाते.

**4.31 पंचायत समिती उपकर निधीतून खुर्ची खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मुळशी, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, मुळशी यांनी प्रमाणक क्रमांक 25 व 26 दिनांक 20/08/2014 अन्वये रूपये 91,688/- या रकमेच्या खुर्च्यांची खरेदी उपकर निधीमधून केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961च्या अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या बाबीमध्ये सदर बाबीचा समावेश नसताना खरेदी करण्यात आलेली आहे.

2) खरेदी एकाच पुरवठादाराकडून केलेली असतांना दोन वेगवेगळे पुरवठा आदेश देऊन खरेदी केल्याने अनियमितता केलेली आहे. खरेदीची दरपत्रके व पाकिटे यांमधील तारखांमध्ये खाडाखोड केलेली आहे.

3) साठा नोंदवही नमुना क्रमांक 32 ची तपासणी करता वेळोवेळी 645 खुर्च्या खरेदीची नोंद आहे. त्यापैकी किती खुर्च्या सुस्थितीत व किती खुर्च्यांचे निर्लेखन केलेले आहे याचा तपशील नसताना केलेली सदर खरेदी अनावश्यक आहे.

**4.32 पंचायत समिती उपकर निधीतून आयपॅड खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मुळशी, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती मुळशी यांनी प्रमाणक क्रमांक 24 दिनांक 20/08/2014 अन्वये रूपये 53,708/- या रक्कमेचे आयपॅड खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मांतस 3814/प्र.क्र.174/39 मंत्रा, मुंबई, दिनांक 24/02/2015 अन्वये आयपॅड महाराष्ट्र शासनातील भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलिस सेवा व त्याअनुषंगाने फक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अनुज्ञेय असतांना पंचायत समितीने गटविकास अधिकारी पंचायत समिती मुळशी यांना अनुज्ञेय नसताना खरेदी केल्याने सदर रक्कम वसुल करावी.

2) केंद्र शासनाकडील दर करारानुसार डी.जी.एस. आणि डी. नवी दिल्ली यांचे दर करार मे. अगमेटल इंडिया प्रा.लि.यांचे नाव नसताना दिलेला पुरवठा आदेश नियमबाह्य आहे.

**4.33 उपकर निधीतून संगणक खरेदी.**

**पंचायत समिती वडगाव मावळ, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती वडगाव मावळ सन 2014-15 पंचायत समिती उपकर निधीतून कार्यालयीन वापरासाठी 4 संगणक खरेदी केले असून सदर खरेदी दर कराराप्रमाणे झाली असून एकूण 4 संगणक प्रती नग रुपये 36,488/- प्रमाणे रुपये 1,45,952/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 95 व 96 (1) मधील तरतुदीनुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांची आदेश दिनांक 18/04/2009 नुसार सदिलावर खर्चाचे संदर्भात दर पत्रके मागविणे त्यास स्वीकृत करणेबाबतचे अधिकार व खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार गटविकास अधिकारी यांना फक्त रुपये 50,000/- पर्यंतच्या शक्तीचे प्रयोजन केले आहे. परंतु वरील खरेदी ही रुपये 1,45,952/- इतक्या रकमेची असल्याने सदर खरेदीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.34 ग्रामपंचायतीचे दप्तर व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर न केलेबाबत.**

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** पंचायत समितीकडील मार्च 2015 अखेर एकूण 109 ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केलेले नसून अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेने शासनाचा लेखापरीक्षणाचा उद्देश सफल झालेला नाही. तसेच ग्रामनिधी तसेच शासन निधीचा विनीयोग योग्य प्रकारे झाला अथवा नाही याची पडताळणी झालेली नाही.

**4.35 ग्रामपंचायत विभागाकडील प्रलंबित अफरातफर प्रकरणांबाबत**.

**पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती मिरजच्या सन 2014-2015 लेखापरीक्षणात ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर प्रकरणांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/2012/प्र.क्र.104/आस्था12, दिनांक 20/04/2012 प्रमाणे ग्रामपंचायत प्रलंबित अपहार प्रकरणे कालबध्द वेळेत निकाली काढलेली नाहीत. ग्रामपंचायत अफरातफर नोंदवहीतील नोंदीनुसार 22 प्रकरणांमध्ये रुपये 47,23,730/- इतकी रक्कम गुंतली आहे.

**4.36 ग्रामसेवक यांच्या सुधारित वेतन श्रेणीबाबत.**

**पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती दक्षिण सोलापूर कडील सामान्य प्रशासन विभाग -2 ची तपासणी केली असता, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. डिएसआर-2009/ प्र.क्र.61/ आस्था-5, दिनांक 20/5/2009 नुसार, सदर विभागाकडील ग्रामसेवकांसाठी दिनांक 01/01/2006 पासून सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली आहे.त्यानुसार ग्रामसेवक संवर्गास रुपये 5200-20200 अधिक ग्रेडवेतन रुपये 2,400/- आणि 7 वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रुपये 5200-20200 अधिक ग्रेड वेतन रुपये 2,800/- ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली होती. परंतु सदर तरतूद महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक डिएसआर-2013/प्र.क्र.30/आस्था-05 दिनांक 09/09/2014 अन्वये रद्द करण्यात आली आहे. सदर निर्णयानुसार दिनांक 01/10/2014 ते दिनांक 31/10/2015 या कालावधीतील ग्रामसेवकांची जादा अदाई एकूण रक्कम रुपये 2,47,772/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.37 पंचायत समितीने जिल्हानिधीतून केलेल्या संगणक खरेदीबाबात. (सेसफ़ंड)**

**पंचायत समिती अंजनगाव सूर्जी, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती अंजनगाव सूर्जी अंतर्गत दरकराराच्या आधारे जिल्हानिधी मधून रुपये 1,86,900/- ची संगणक खरेदी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदे मंजूरी घेण्यात आली नाही.

2) प्रशासकीय व तांत्रीक मंजूरी घेण्यात आली नाही.

3) डीलीव्हरी चलान वर 5 नग संगणकाची नोंद असून प्रमाणक क्रमांक 1590 दिनांक 31/03/2015 अन्वये 3 नग रक्कम रुपये 1,40,175/- व प्रमाणक क्रमांक 1637 अन्वये 1 नग रक्कम रुपये 46,725/- असा खर्च करण्यात आला आहे. डीलीव्हरी चलना वर दिनांक नमुद नाही. खुलासा करावा.

4) संगणकाची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आली नाही,त्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री पटत नाही.

5) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1000/प्र क्र 14/ कोषा-4 दिनांक 11/02/2000 नुसार दिनांक 15 फ़ेब्रुवारी नंतर संगणक किंवा त्याचे सुटे भाग खरेदी करु नये असे असतांना दिनांक 31/03/2015 रोजी 4 संगणक खरेदी करण्यात आले आहेत.खुलासा करावा.

6) गुणवत्ता नियंत्रण कक्षाचा तपासणी अहवाल सादर करण्यात आला नाही.

**4.38 जनसुविधा योजनेतुन केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती दर्यापूर, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती दर्यापूर ने जनसुविधा योजनेतुन केलेल्या बांधकामावर सन 2014-2015 मध्ये रक्कम रुपये 9,36,487/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - झेडपीए-2010/275/प्र.क्र.175/परा-7/मंत्रालय मुंबई, दिनांक 19/10/2011 नुसार बांधकामासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविली नाही.

2) बांधकामाची निविदा ब वर्ग दैनिक व क वर्ग साप्ताहिकात देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा रुपये 17,245/- ची कामे सक्षम प्राधीकारी यांचे मंजुरी शिवाय करण्यात आली.

4) निविदा फ़ी ची रक्कम देयकातून कपात केली आहे. यावरुन कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रीया न राबवता सरसकट ग्राम पंचायतींना काम दिल्याचे दिसुन येते.

5) ग्रामपंचायतीच्या वार्षीक जमा खर्चाची पडताळणी न करता कामे देण्यात आली.

6) बांधकामावर वापरण्यात येणा-या साहित्याचे चाचणी अहवाल घेण्यात आले नाही.

7) बांधकाम करण्यात येत असलेली जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत नमुना 8 नस्तीस आढळून आला नाही.

8) करारनाम्यावर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 16 व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - झेडपीए-2000/प्र.क्र.44/33/मंत्रालय मुंबई दिनांक 22/12/2000 अन्वये तांत्रीक अभियंत्याने कामाची मोजमापे दिनांकीत स्वाक्षरीसह प्रमाणीत केली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना 69 मध्ये कामाची नोंद्वही ठेवली नाही तसेच काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदवला नाही.

**4.39 संगणक खरेदीतील अनियमीतता. (सेस फ़ंड)**

**पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांनी रक्कम रुपये 81,408/- रुपयाचे संगणक खरेदी केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा धारक अधीकृत असल्याची खात्री न करता पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

2) पुरवठा आदेशावर जावक क्रमांक नमुद नाही,त्यामुळे रितसर पुरवठा आदेश दिल्याचे दिसुन येत नाही.

3) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परीपत्रक क्रमांक संकीर्ण 1000/प्र क्र 14/कोषा-4 दिनांक 11/02/2000 नुसार 15 फ़ेब्रुवारी नंतर संगणक खरेदीच्या प्रस्तावास मंजुरी देता येत नसतांना दिनांक 30/03/2015 रोजी संगणक खरेदी केल्याचे दिसुन येते.

4) आयकर व विक्रीकराची रक्कम रुपये 3,256/- कपात केली नाही.

5) सदर साहीत्याचे डिलीव्हरी मेमो लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) संगणक खरेदीस सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी घेतली नाही.

**4.40 नियमबाहय कायम प्रवास भत्ता प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती अकोला, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** वेतन देयकाची पडताळणी केली असता ग्रामसेवक (रजा आरक्षीत पदावर) कार्यालयात कार्यरत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 09/12/2011 नुसार ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना दरमहा 1,100/- रूपये कायम प्रवास भत्ता देण्यात येतो. श्री राजु शाशिटे व श्रीकृष्णराव दे देशमुख रजा आरक्षित ग्रामसेवक म्हणुन कार्यालयात काम करीत असल्याने सदर कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही. नियम बाहय कायम प्रवास भत्ता प्रदानाची संबंधीताकडून रूपये 26,400/- वसुली करण्यात यावी.

**4.41 10 वी व 12 वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना एम. एस. सी. आय. टी. प्रशिक्षण देणेबाबत.**

**पंचायत समिती मुर्तिजापूर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत विभागाने 10 वी 12 पास झालेल्या विद्यार्थ्यांना एम. एस. सी. आय. टी. प्रशिक्षण देणे योजना राबविली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 20/06/2008 नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

2) पंचायत समिती मासिक सभा इतिवृत्त नोंदवही पाहता 38 लाभर्थी अर्ज वैध ठरले परंतू प्रत्यक्ष केवळ 36 अर्ज प्राप्त हाते. तसेच प्रत्यक्षात लाभ 30 विद्यार्थ्यांना देण्यात आला प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांनी प्रशिक्षण वर्गाचा लाभ घेतल्याबाबत हजेरी रजिस्टर सादर केले नाही.

3) 31 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण सुरू केले असून 24 विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक परीक्षा फी भरल्याच्या पावत्या जोडण्यात आल्या आहेत. असे असतांना परीक्षा फी चे प्रदान विद्यार्थ्यांना न करता सी. सी. आय. टी. कम्प्युटर ला केले आहे त्यामुळे दुबार प्रदानाची शक्यता आहे.

4) सी. सी. आय. टी. कम्प्युटर कडून 3 विद्यार्थ्यांचे पोच पावत्या प्राप्त असून प्रत्यक्षात 6 विद्यार्थ्यांचे अनुदान प्रदान करण्यात आले असल्याने रुपये 3,000/- प्रति असे रूपये 9,000/- जादा प्रदान करण्यात आले आहे.

**4.42 श्री.एस.के.इंगळे ग्राम विस्तार अधिकारी यांचे प्रतिनियुक्तीबाबत.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचे आदेश क्रमांक जिप/साप्रवि/स्था-2534 दिनांक 16/04/2004 अन्वये श्री.एस.के.इंगळे, ग्राम विस्तार अधिकारी, पंचायत समिती मानोरा आस्थापना येथुन पंचायत विभाग जिल्हा परिषद वाशिम येथे कार्यालयीन कामकाजाकरीता दिनांक 09/07/2004 पासुन प्रतिनियुक्तीवर आहेत.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मांक प्रतिनि 2006/प्र.क्र.390/आस्था-9 दिनांक 27/06/2006 नुसार वर्ग-3 व वर्ग-4 यांच्या प्रतिनियुक्त्या विभागीय आयुक्त यांच्या पुर्वपरवानगीनेच कराव्यात व प्रतिनियुक्ती बाबतचा तिमाही अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे पाठवावा. मात्र श्री.एस.के.इंगळे यांचे प्रतिनियुक्ती बाबत विभागीय आयुक्त् यांची पुर्वपरवानगी घेतलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक डिएसआर 2010/प्र.क्र.178/ आस्था-5 दिनांक 09/12/2011 नुसार ग्रामसेवकांना सातत्याने कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरीता कायम प्रवास भत्ता रक्कम रुपये 1,100/- प्रतिमाह प्रमाणे मंजुर केलेला आहेत. मात्र एस.के.इंगळे हे कार्यालयीन कामाकरीता प्रतिनियुक्तीवर असल्याकारणाने तसेच त्यांनी प्रवास केल्याबाबत दौरा दैनंदिनी सादर न केल्यामुळे त्यांना अदा केलेला कायम प्रवास भत्ता सन 2014-15 मधील रक्कम रुपये 13,200/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.43 ग्रामपंचायत साठा लोखंडी घंटागाडी खरेदी खर्चातील अनियमिततबाबत.**

**पंचायत समिती पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11)** - ग्रामपंचायतीनी लोखंडी घंटागाडी खरेदी योजनेत रुपये 30,75,000/- ऐवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.27/33 मंत्रालय, मुंबई 32, दिनांक 05/09/2000 अन्वये रक्कम रुपये 50,000/- वरील खरेदी करीता दोन लखोटा पध्दतीचा अवलंब केला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक संकीर्ण 2013/प्र.क्र.49/पंस/7 मुंबई 32, दिनांक 07/02/2013 नुसार एक लाख व त्यापेक्षा जास्त किमंतीच्या साहित्य खरेदी करीता ई-निविदा प्रणालीचा वापर केला नाही.

3) विहीत नमुन्यातील व योग्य गुणवत्तेवर घंटागाडी प्राप्त झाल्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तपासणी करुन अहवाल घेतला नाही.

4) खरेदीबाबत प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी अप्राप्त आहे.

5) घंटागाडी खरेदी केल्याबाबत डिलिव्हरी चलान उपलब्ध नाही तसेच साठा नोंदवही उपलब्ध नाही.

6) महाप्रधान ग्रामपंचायती वगळता इतर ग्रामपंचायती मध्ये सफाई कामगाराचे पद मंजूर कृती आराखडयात नाही, त्यामुळे घंटागाडी विनावापर ग्रामपंचायत स्तरावर पडून आहेत.

7) विक्रीकर नियमानुसार पुरवठाधारकाचे देयकातुन 5 टक्के विक्रीकर मुल्यवर्धीत कर रक्कम रुपये 1,53,750/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.44 13 वा वित्त आयोग अंतर्गत घंटागाडी खरेदी खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती घाटंजी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** 13 वा वित्त आयोग मधुन सन 2014-2015 मध्ये घंटागाडी खरेदीवर रुपये 28,50,000/- ऐवढा खर्च केला. पुरवठाधारक जनता फर्निचर मार्ट पांढरकवडा याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) घंटागाडी खरेदीबाबत स्वतंत्र प्रशासकीय मंजूरी आदेश नाही.

2) शासन निर्णय 02 जानेवारी, 1992 नुसार वर्तमान पत्रात जाहीरात देवून दोन लिफाफा पध्दतीने अधिकृत पुरवठाधारकाकडून निविदा मागविणे आवश्यक असतांना गटविकास अधिकारी यांचे परवानगीने सुचनाफलकावर जाहीरनामा प्रसिध्दी करुन स्थानिक रित्या घंटागाडी खरेदीवर रक्कम रुपये 28,50,000/- एवढा खर्च करण्यात आल्याने खरेदीबाबत पुरेशी प्रसिध्दी मिळाली नाही.

3) दरपत्रक उघडणे बाबत गटविकास अधिकारी यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

4) घंटागाडी योग्य गुणवत्तेची प्राप्त झाल्याबाबत शासकीय प्रयोग शाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

5) ग्रामपंचायतीने घंटागाडी मागणी बाबतचे पत्र नस्तीत उपलब्ध नाही.

6) आयकर अधिनियम 1961 चे बाबत कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रक्कम रुपये 65,550/- संबधीत वसुल करुन जमा दर्शवावी.

**4.45 घंटागाडी खरेदीतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वणी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18)** - सदर घंटागाडी खरेदीवर रक्कम रुपये 24,90,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 1 अन्वये मे. बैलीमकडुन घेतलेली घंटागाडी रक्कम रुपये 25,000/- प्रमाणे घेतलेली असतांना मे. जनता फर्निचर मार्ट कडुन रक्कम रुपये 26,000/- म्हणजेच रक्कम रुपये 1,000/- जादा ने खरेदी केल्याचे मत आहे.

2) पंचायत समितीने शासन निर्णयानुसार कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 1,000/- प्रमाणे रक्कम रुपये 90,000/- चे नुकसान झालेले आहे.

3) सदर घंटागाडी बाबत तांत्रिक अधिका-याकडुन तपासणी व मार्गदर्शन घेतले नाही.

4) मे. बैलीम व मे. जनता फर्निचर हे अधिकृत पुरवठादार नसुन नोंदणीकृत क्रमांक नाही.

5) ग्रामपंचायतीकडे खरेदी पुर्वी घंटागाडी मागणी व आवश्यक कर्मचारी आहे किंवा नाही यासंदर्भात कार्यालयात अभिलेखे उपलब्ध नाही.

6) देयकातून 2 टक्के आयकर व 2 टक्के विक्रीकर कपात केली नाही.

7) सदर घंटागाडीचे उपयोग सातत्याने होत आहे याबाबत अभिलेखे दप्तरी उपलब्ध नाही.

**4.46 राजीव गांधी पंचायत सबळीकरण अंतर्गत क्रांती ज्योती महीला प्रशिक्षणावर नियमबाहय खर्च करणेबाबत.**

**पंचायत समिती संग्रामपुर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला प्रशिक्षणाकरीता ग्राम पंचायत, काटेलसाठी रक्कम रुपये 47,520/- प्रदान केले असता त्यांनी रक्कम रुपये 47,250/- खर्च केला असुन रुपये 270 /- अखर्चित आहे. ग्रामपंचायत, पातुर्डा यांना रक्कम रुपये 47,520/- प्रदान केले असता, त्यांनी रक्कम रुपये 43,300 /- खर्च केला असुन रक्कम रुपये 4,420 /- अखर्चित आहे. सदर अखर्चित रक्कमा शासन खाती परत केल्या नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्र. संकीर्ण 2014 / प्र.क्र. 67 / योजना-4, बांधकाम भवन, मुंबई, दिनांक 20 मे, 2014 नुसार दिलेल्या “परीशिष्ट 1” नुसार स्थानिकस्तरीय 3 दिवसाचे प्रशिक्षणाकरीता खर्च मर्यादा असतांना ग्रामपंचायत पातुर्डा यांनी भोजन खर्चावर रक्कम रुपये 35,050/- खर्च केला प्रशिक्षक मानधनावर रक्कम रुपये 8,250/- खर्च केला तो मर्यादेबाहेर आहे. ग्रामपंचायत, काटेल यांचे प्रशिक्षक मानधनावर रक्कम रुपये 21,250/- खर्च केला. तो मर्यादेबाहेर आहे. उपस्थिती नोंदवही नुसार 20 महिला उपस्थिती दर्शविली असतांना भोजनावर 40 व्यक्तीवर नियमबाहय खर्च केला.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 2014/प्रक्रं.67 योजना-4, दिनांक 24 जुलै, 2014 नुसार योजने संबंधी प्रशिक्षण देण्यासाठी यशदा, पुणे या स्तरावरील प्रशिक्षकांना निमत्रण देवुन प्रशिक्षणाची व्यवस्था करणेच्या सुचना असतांनाही स्थानिक प्रशिक्षकाना बोलवून त्यांचे मानधनावर नियमबाहय खर्च केला. प्रशिक्षणार्थीना पायाभुत प्रशिक्षण न मिळाल्याने योजनेचा मुळ उद्देश सफल न झाल्याने केलेला खर्च निष्फळ ठरतो.

4) संबधीत ग्रामपंचायतीनी विनियोग प्रमाणपत्र सादर केले नाही

5) प्रशिक्षण कोणत्या विषयावर होते, याबाबत कोठेही उल्लेख नाही. प्रशिक्षणाची वेळ कोणती होती याचा सुध्दा उल्लेख नाही.

**4.47 राजीव गांधी ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांना प्रशिक्षण खर्च केल्याचा आभास निर्माण करुन शासकीय अनुदानाचा दुरुपयोग करणेबाबत.**

**पंचायत समिती शेगांव, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 2014/प्रक्रं.67 योजना-4 दिनांक 24 जुलै 2014 नुसार तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी व सचिव यांना योजनेसंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी यशदा प्रशिक्षण संस्था पुणे येथील प्रशिक्षीत तज्ञ व्यक्तीकडुन कार्यक्रमाची माहीती देणे आवश्यक असतांना कोणत्याही तज्ञामार्फत प्रशिक्षण दिल्याचे नस्तीवरुन आढळुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 2014/प्रक्रं.67 योजना-4, दिनांक 24 जुलै, 2014 अन्वये प्रत्येक मेळाव्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात दुरदर्शनवर किंवा इतर प्रसार माध्यमादवारे भरीव प्रसिध्दी करावी असे स्पष्ट निर्देश असुनही याबाबत कोणताही खर्च केला नाही. लांजुळकर बिछायत केंद्र शेगाव यांना मेळाव्याची व्यवस्था केल्याबाबत रक्कम रुपये 20,000/- चे देयक हे मोघम स्वरुपाचे असल्याने हा खर्च लेखापरीक्षणास मान्य नाही.

3) लांजुळकर बिछायत केंद्र, शेगांव यांचे मोघम देयक असल्याने या केंद्राने कोणती व्यवस्था केली हे स्पष्ट होत नाही तसेच नस्ती मध्ये लांजुळकर बिछायत केंद्र यांचे बरेच कोरे देयके आढळुन आली आहेत.

4) दरपत्रके मागवितांना 100 व्यक्तीचे व्यवस्थेसाठी रक्कम रुपये 20,000/- दर लांजुळकर यांना दिले परंतु नस्तीमधील फोटोनुसार प्रशिक्षणामध्ये केवळ 34 व्यक्ती उपस्थित असल्याचे दिसुन येते.

वरील अनियमिततेमुळे शासकीय अनुदानाचे नुकसान झाले आहे.

**4.48 ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणाबाबत.**

**पंचायत समिती चिखली, जिल्हा बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 45) -** पंचायत विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार सामान्य निधी/जरोयो/13 वा वित्त आयोग मधील अफरातफर प्रकरणामध्ये रक्कम रुपये 28,80,054/- थकीत असल्याचे आढळले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, चिखली अंतर्गत पंचायत विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार सामान्य निधी /जरोयो/13 वा वित्त आयोग मधील एकुण 26 अफरातफर प्रकरणामध्ये रक्कम रुपये 28,80,054/- दिनांक 31/03/2015 अखेर थकीत आहेत. सामान्य निधीचे 14 प्रकरणात रक्कम रुपये 13,30,550/- व योजनांच्या 12 प्रकरणामध्ये रक्कम रुपये 15,49,504/- इतकी रक्कम गुंतलेली आहे.

2) अफरातफर प्रकरणामध्ये रक्कम रुपये 28,80,054/- थकीत असुन याबाबतची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही त्यामुळे प्रलंबित प्रकरणाची सत्यता पडताळता आली नाही. अफरातफर प्रकरणाबाबत संबंधीत सचिवावर जबाबदारी निश्चीत करुन 100% वसुली करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणाचा जलदगतीने निपटारा होत नसल्याने दिवसेंदिवस अपहार प्रकरणामध्ये वाढ होत आहे.

**4.49 श्री. केजाजी वंजारी, सहायक अधिक्षक यांचा वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाबाबत. (हस्तांतरण योजना)**

**पंचायत समिती समुद्रपुर, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** श्री. केजाजी वंजारी, सहायक अधिक्षक यांच्या वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्ती देयकास विभाग प्रमुखाची मंजुरी नसतांना प्रमाणक क्रमांक 980 दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 25,276/- प्रदान करण्यात आले आहे. मुख्य तथा वित्त अधिकारी यांची मंजुरी आहे. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 व सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय, क्रमांक

वेखंप्र-2011/प्र.क्र.333/2011 राकावी-2 दिनांक 16/11/2011 तसेच नुसार रक्कम रुपये 1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदान करण्यात आले आहे. नियमबाहय प्रदाना बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.50 अतिरीक्त कार्यभारात झालेली अनियमीतता. (हस्तांतरण योजना)**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. डी. बी. वायरे, कनिष्ठ लेखा अधिकारी यांचेकडे सहायक लेखा अधिकारी पदाचा कार्यभार सोपवुन त्यांच्याकडील मुळ पदाचा कार्यभार इतरांना देण्यात आला. महाराष्ट्र शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक 27/12/2011 व महाराट्र नागरी सेवा (वेतन) नियम 2009, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 च्या नियम 56 नुसार श्री. डि. बी. वायरे यांनी स्वत:च्या पदाचा कार्यभार सोडल्याने त्यांना अतिरीक्त कार्यभाराचा मोबदला अनुद्देय नसताना प्रदान करण्यात आले. श्री. डी. बी. वायरे, यांना प्रदान केलेल्या अतिरीक्त मेहनताना जवळपास रुपये 60,000/- प्रदान केल्याचे दिसुन येते. सदर प्रमाणकाची मागणी करुनही सदर प्रमाणक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

2) श्री. डि. बी. वायरे यांचे कनिष्ठ लेखा अधिकारी हे पद रिक्त नसताना श्री व्ही. बि. वानखेडे, वरिष्ठ सहायक लेखा यांना देण्यात आले. पद रिक्त नसतांना व पदावर कर्मचारी कार्यरत असतांना सदर पदाचा कार्यभार ईतरांना सोपविता येवू शकतो ही बाब लेखापरिक्षणास अनाकलनीय आहे. सदर बाबतीत श्री वानखेडे यांना दिलेला अतिरीक्त मेहनताना रुपये 20,342/- वसुलपात्र ठरते.

3) शासन निर्णय, दिनांक 23/05/2006 मधील परिच्छेद 3 ब व शासन निर्णय दिनांक 10/09/2001 मधील आदेशानुसार सहा महिन्यापेक्षा अधिक काळ पद रिक्त राहुनही व्यपगत न होणा-या पदाकरीता अतिरीक्त कार्यभार सहा महिन्यापेक्षा जास्त काळ ठेवता येत नसताना पंचायत समितीने ग्रामसेवक किंवा इतर कर्मचा-यांचे सहा महिन्यापेक्षा अधिक काळाकरीता अतिरीक्त कार्यभार सोपविलेला आहे. महाराष्ट शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 27/12/2011 व महाराट्र नागरी सेवा (वेतन) निम 2009 महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 च्या नियम 56 नुसार नियमबाहय अतिरीक्त मेहनताना दिलेल्या रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**4.51 मालगुजारी तलाव लिलावातील गंभीर अनियमिततेबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, पवनी व्दारे 21 तलावाचे लिलाव करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी पशुसवंर्धन दुग्ध व्यवसाय व मत्य व्यवसाय विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक मत्स्यवि 1213/प्र.क्र 48/ पदुम 13, दिनांक 05/12/2013 अन्वये मालगुजारी तलाव लिलावाबाबत सुधारीत दर म्हणजे प्रति हेक्टरी 450 आकारण्यात यावे असे नमुद आहे. परंतु पंचायत समिती, पवनीतर्फे रुपये 300/- प्रति हेक्टर आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे सुधारीतदराने आकारणी करुन अतिरिक्त रक्कम रुपये 84,127/- तात्काळ संबधित संस्थेकडुन वसुल करण्यात यावे.

2) जिल्हा उपसमिती, तलाव वाटप समितीव्दारे एकुण 17 तलावांचे संस्थानी मागणी केल्यानुसार लिलाव करुन मजुरी प्रदान केलेली आहे. त्याप्रमाणे पंचायत समिती, पवनीव्दारे 17 तलावांचे लिलाव करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता जिल्हा तलाव वाटप समितीने मंजुर करुन दिलेल्या यादीव्यतिरीक्त आकोट येथिल पाच तलाव, सावरला व भावड यांचे प्रत्येकी एक असे एकुण 7 तलावांचे लिलाव परस्पर केल्याचे दिसुन येत.

**4.52 पंचायत समिती, सेस फंडातून भूमीपुजन व लोकार्पण सोहळयाकरीता जाहीरात खर्चाबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, तुमसर व्दारे भूमीपुजन व लोकार्पण सोहळयातील जाहीरातीकरीता प्रमाणक क्रमांक 10 दिनांक 26/02/2015 रक्कम रुपये

10,000/- प्रमाणक क्रमांक 11 दिनांक 05/03/2015 रक्कम रुपये 35,000/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये 45,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 101 च्या दुस-या अनुसुचित हार्दिक अभिनंदन जाहिरात खर्च करण्याबाबत तरतुद नसतांना भूमीपुजन व लोकार्पण सोहळा या समारंभाकरीताची जाहीरातीवर विविध पाच वृत्तपत्रात देवुन एकुण रुपये 45,000/- खर्च केलेला आहे.

2) उपरोक्त प्रमाणकांशिवाय इतर कोणतेही प्रमाणकेव्दारे भूमिपुजन व लोकार्पण कोणत्या व किती कामांचे करण्यात आले याचा खुलासा पंचायत समिती व्दारे करण्यात आला नाही. सबब पंचायत समितीने फक्त जाहीरातीवरच केलेला संपुर्ण खर्च नियमबाहय ठरुन वसुलपात्र ठरतो.

**4.53 ग्रामपंचायत पोंगेझ्रा येथील यात्रा व्यवस्थेवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती गोरेगांव, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21)** - लेखापरीक्षण वर्ष 2014-2015 मध्ये ग्रामपंचायत पोंगेझरा येथे यात्रा व्यवस्थेसाठी रुपये 60,000/- देण्यात आलेल्या अनुदानाबाबत खर्च विनियोग अहवाल सादर करण्यात आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपयोगिता प्रमाणपत्रावर पत्र क्रमांक दिनांक नमुद नाही. त्यामुळे ते केव्हा पाठविण्यात आले. याबाबत लेखापरिक्षणामध्ये खातरजमा करुन घेता आले नाही.

2) ग्रामपंचायतीने खर्च विनियोग अहवाल सादर केले नसल्याने प्राप्त अनुदान त्याच प्रयोजनावर खर्च झाल्याचे स्पष्ट होत नाही.

उपरोक्त बाबीची पुर्तता होणे आवश्यक आहे.

**4.54 पर्यावरण संतुलीत समृदध ग्राम योजना पात्र ग्रामपंचायतींना अनुदान निधी वितरणातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गौरेगांव, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** लेखापरीक्षण वर्ष 2014-2015 मध्ये पर्यावरण संतुलीत ग्राम समृदधी योजना अंमलबजावणीत अनियमितता आढळून आल्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुदान वितरणाच्या अटी व शर्ती क्रमांक 2 प्रमाणे सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजुर करण्यात आले त्याच बाबीवर खर्च घालणे आवश्यक असतांना सन 2012-2013 मध्ये प्रत्यक्ष निकष पुर्ण केलेल्या ग्रामपंचायतीचे निरीक्षण अहवाल लेखापरीक्षणास पाहावयास मिळाले नाही.

2) अट क्रमांक 3 प्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाचा आपले पंचायतसमिती मधील लेखा विभागाशी ताळमेळ करुन खर्चाचा मासिक अहवाल विहीत नमुन्यात बाबनिहाय अनुदान खर्ची घातल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र अनुदान वितरण आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत कार्यालयात सादर करावयाचे असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) ग्रामपंचायत, पुरगांव यांना रुपये 1,10,000/- प्राप्ती बाबतची पोचपावती देयकासोबत नाही. त्यामुळे रक्कम संबंधित ग्रामपंचायतीस प्राप्त्ा झाल्याबाबत खुलासा करणे आवश्य्ाक आहे.

**4.55 13 व्या वित्त् आयोग अंतर्गत केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** 13 व्या वित्त अखर्चित व व्याज रकमेतून रुपये 3,17,177/- किंमतीचे 7 संगणक व प्रिंटर दिनांक 31/03/2015 मध्ये खरेदी केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 व्या वित्त आयोगाची अखर्चीत व व्याजाची प्राप्त रक्कम महराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागृ शासन निर्णय तेविआ/2010/प्र.क्र.22/वित्त - 4, दिनांक 30 ऑगस्ट 2010 नुसार संगणक व प्रिंटर खरेदीवा खर्च करता येत नसतांना संबंधीत अधिकाऱ्याने नियमबाहयरीत्या प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी देऊन शासन निर्णयाच्या विपरीत खरेदी केली. त्यामुळे संबंधीतांवर याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

2) व्याजाची रक्कम संगणक व प्रिंटर खरेदीवर खर्च करणेबाबत पंचायत समितीने त्यांचे पत्र क्रमांक 48 दिनांक 19/01/2015 नुसार परवानगी मागितली तथापी मा. मुख्य कार्यापालन अधिकारी, जिल्हा परीषद चंदपूर यांचेकडुन सदर खरेदीस कार्यपुर्व/ कार्योत्तर परवानगी मिळाल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाही. म्हणजेच मा. मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परीषद, चंदपूर यांनी सदर खरेदीस परवानगी दिलेली नाही.

3) उपरोक्त प्रमाणे झालेल्या रुपये 3,17,177/- एवढ्या खर्चास शासनाची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे. अन्यथा रुपये 3,17,177/- संबंधीताकडुन वसुल करुन शासनास परत करणे आवश्यक आहे.

4) संगणक व प्रिंटर दरकरारामध्ये खरेदी केलेले आहेत. परंतु प्रिंटर खरेदीबाबत मार्च 2015 या महिण्याचे दरकरार लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.56 ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाकडे दुर्लक्षतेबाबत.**

**पंचायत समिती जिवती, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षा अधिनियम 1961 मधील तरतुदीनुसार पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागाचे लेखापरीक्षकांनी करुन लेखा परिक्षण अहवाल सबंधित ग्रामपंचायतींना निर्गमित करुन अहवालाची प्रत सबंधित संवर्ग विकास अधिकारी व सबंधित जिल्हा परिषदला एकाच वेळी निर्गमित केलेली आहे.

जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीने ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 140 (3) (क) प्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाने केलेला अपहार, नियमबाह्य खर्चाची वसुली अद्यापही झालेली नाही. नियंत्रण ठेवण्यासाठी लेखा आक्षेप निपटारा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती निहाय एकूण किती ग्रामपंचायतींची लेखा आक्षेपाप्रमाणे अफरातफरीची रक्कम वर्ष निहाय ग्रामपंचायतीकडे / ग्रामसेवकाकडे वसुल करणे प्रलंबित आहेत याबाबतचा शोध घेता आला नाही.

**4.57 शुभेच्छा जाहीरातीवर केलेल्या नियमाबाहय खर्चाबाबत.**

**पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** दैनिक देशोन्नतीच्या 10 व्या वर्धापन दिना निमित्य हार्दिक शुभेच्छा वर्धापन दिन व दिपावली विशेषांक 2014 मध्ये पंचायत समिती सदस्याचे शुभेच्छा देण्याकरीता दैनिक देशोन्नती पेपर मध्ये जाहीरात देण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खर्चाचे संदर्भात लेखापरिक्षणास जे बिल उपलब्ध झाले त्या बिलात जाहीरातीबाबत एकमुस्त रक्कम दर्शविलेली आहे. जाहीरात किती चौरस मीटर किती बाय किती त्याचे दर नमुद नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक/जीबीसी/1086/11745, दिनांक 01/07/1967 व शासन निर्णय क्रमांक 2594/ प्र.क्र.148/अर्थसंकल्प 19 दिनांक 12/04/1994 अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीला शुभेच्छा जाहीरातीवर खर्च करता येत नाही. असे असतांना उपरोक्त प्रमाणकान्वये शुभेच्छा जाहीरातीबाबत रूपये 40,522/- नियमबाह्य खर्च झालेला आहे.

**4.58 सभापती यांनी शासकीय वाहनाने एकट्याने दौरे करणेबाबत.**

**पंचायत समिती अहेरी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** सभापती यांनी एकटयाने शासकीय वाहनाने दौरे केल्यामुळे 4,006/- रूपयेने निधीचे नुकसान झाले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.जेईपी/2464/42302/ डि1/सचिवालय मुंबई,दिनांक 07/05/1969 नुसार तसेच, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, ठराव क्रमांक जिप/2469/17703/डी-1,दिनांक 14/11/1969 अन्वये वाहनाचा वापर / विनियोग करतांना पंचायत समिती स्तरावरील विकास कामाची पाहणी करतांना पंचायत समितीचे संबंधीत अधिकारी/कर्मचारी सोबत दौऱ्यात असणे आवश्यक आहे. परंतु वरील दौऱ्यामध्ये लॉगबुकवर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे नाव अथवा सही आढळुन आली

नाही. त्यामुळे सभापती यांनी एकट्याने शासकीय वाहनाने दौरा केल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास 1005/प्र.क्र.33/सेवा-5,दिनांक 08/07/2005 नुसार खाजगी प्रवासाकरीता रूपये 8 प्रति किलोमीटर प्रमाणे एकुण किलोमिटर 575 x 8 = 4,600/- रूपये संबंधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

**4.59 वेतन व भत्ते देयकांच्या प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भामरागड, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** वेतन व भत्ते देयकाचे प्रदानाकरीता रक्कम रूपये 45,500/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएसआर 2010/ प्र.क्र.178/आस्था-5,दिनांक 09/12/2011 अन्वये दिनांक 01/01/2012 पासुन ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना दरमहा रूपये 1,100/- प्रमाणे वेतनासोबत कायम प्रवास भत्ता देय आहे. त्यामुळे पुन्हा वेतनात रूपये 400/- प्रतिमहा वाहन भत्ता अनुज्ञेय नाही. उपरोक्त वेतन देयकाव्दारे सदर ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांना प्रतीमाह 400/- रूपये प्रमाणे माहे मार्च 2014 ते माहे फेब्रुवारी 2015 पर्यंत एकुण रूपये 45,500/- वेतनातुन दिल्याचे वार्षिक वेतन विवरणपत्रावरून दिसुन आले.

2) माहे जानेवारी 2012 पासुन विशेष वेतन प्रदान केले आहे. त्याची परिगणना करून संबंधीतांकडून प्रदानीत रक्कम वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.60 यशवंत पंचायत राज अभियानाअंतर्गत मिळालेल्या बक्षिसाच्या रक्कमेतुन सौर दिवे खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती खुलताबाद मिळालेल्या बक्षिसाच्या रक्कमेतुन मासिक सभेच्या ठराव क्रमांक 113 अन्वये तांत्रिक मान्यतेचे अधिकार गटविकास अधिकारी यांना विदयुत कामासंदर्भात अधिकार नसतांना मान्यता देवुन सौर उर्जेवरील दिवे खरेदी केले आहे.

2) खरेदी करतांना प्रशासकिय खर्च व नियमानुसार अदा करावे लागणारे कर, तपासणी खर्च कपात करुन उर्वरित रक्कम पुरवठादारास दयावी परंतु पंचायत समितीने कोणतीच कपात न झाल्याने रूपये 31660/- ची जादा अदाई झालेली आहे.

3) साहित्य प्राप्तीनंतर सोलार प्रॉडक्टची तपासणी शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडुन करुन घ्यावी ती केलेली नाही.

4) देयकात 9 वॅट एलइडी सोलार स्ट्रीट लाईट असा उल्लेख आहे. परंतु या नावाचा दर करार नाही त्यामुळे दर कराराप्रमाणेच साहित्य प्राप्त झाले याची तपासणी अहवाला अभावी खात्री करता आली नाही.

**4.61 अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाबाबत व वेतन आहरीत करणेबाबत.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात गटशिक्षणाधिकारी बीड यांचे कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षकांना रक्कम रुपये 52,97,399/- वेतन आहरीत करुन प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 86, दिनांक 23/09/2015 अन्वये अतिरिक्त शिक्षकांची माहिती मागविण्यात आली होती, परंतु गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने मंजुर आकृतीबंध शाळानिहाय मान्य शिक्षकांची संख्या, अतिरिक्त शिक्षकांची संख्या, तदर्थ प्रणालीकडून किती अतिरिक्त शिक्षकांचे वेतन आहरीत केले व कोणत्या कालावधीचे केले याबाबतची सविस्तर माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध केली नाही.

2) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक प्राशिअ/पदनिश्चिती /20115-502/6978/ प्राथमिक शिक्षण यांचे दिनांक 03/10/2011 नुसार 30 सप्टेंबरच्या पटसंख्येनुसार शाळानिहाय अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षकांचे समायोजन संबंधीत अधिका-याने 30 ऑक्टोबर पर्यंत करावयाचे आहे. यानंतरही समायोजन झाले

नाही तर त्यांचे वेतन त्या शाळेवर देय ठरणार नाही. त्यांच्या वेतनाची जबाबदारी संबंधीत अधिका-यावर राहील. असे निर्देश असतांनाही पंचायत समिती, बीड गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने 30 ऑक्टोबर 2014 नंतर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन केल्याचे दिसुन आले नाही.

3) शिक्षण विभागाने अतिरिक्त शिक्षकांचे वेतन अदा केल्याचे दिसुन आले. संबंधीत शिक्षकाचे पद मान्यता नसतानाही इतर पदावरुन वेतन आहरीत करुन अदाई केल्याचे दिसुन येते. इतर कर्मचा-यांच्या पदावर अतिरिक्त कर्मचा-यांचे वेतन आहरीत करुन प्रदान केले आहे. श्रीमती अनिता तात्यासाहेब गायकवाड प्रा.शा. आहेरवडगाव अतिरिक्त शिक्षीका यांचे वेतन श्रीमती शितल रामकिसन शिंदे सहशिक्षक यांच्या रजेच्या कालावधीत वेतन आहरीत करुन प्रदान केले आहे. यानुसार अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाची रक्कम रुपये 52,97,399/- वसुल पात्र ठरते.

**4.62 पंचायत समिति, आष्टी यांनी 13 व्या वित्त आयोगांतर्गत शासन निकषा बाहेरील कामे करुन नियमबाहय खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिति, आष्टी यांनी ग्रामपंचायतमधील अंतर्गत रस्त्यावर विदयुत पथदिवे बसविण्यासाठी रुपये 22,38,352/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासनाच्या मार्गदर्शक सुचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक तेविआ/2010/प्र.क्र.22/वित्त-4 दिनांक 30/08/2010 अन्वये 13 व्या वित्त आयोगामधुन कोणती कामे घ्यावीत याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. परंतु पंचायत समितीने वरील कामावर केलेला रुपये 22, 38,352/- हा खर्च रस्त्यावर विदुयत पथदिवे बसविण्यासाठी केलेला आहे. जो शासनाने ठरवुन दिलेल्या बाबीमध्ये अंतर्भूत नसल्याने सदरचा संपुर्ण खर्च नियमबाहय ठरतो.

2) उपरोक्त सर्व कामाच्या अंदाजपत्रकास सक्षम तांत्रिक अधिका-याची मंजुरी घेतली नसल्याचे आढळून आले.

3) सदर कामे ही रस्त्यावर विदयुत पोल उभारणी करणे केबल/वायर फिटींग इ. करुन विदुयत दिवे बसविणेची होती यासाठी ग्रामपंचायतीकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री असल्याबाबतची गटविकास अधिकारी यांनी खात्री करुनच कामे सक्षम यंत्रणेस देणे अभिप्रेत होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. कामाच्या गुणवत्तेबाबतचे अहवाल दर्शविलेले नाहीत. सदरील कामावर करण्यात आलेला खर्च रुपये 22,38,352/- अंतिम अमान्य करण्यात येतो.

**4.63 ग्रामसेवकांना रुपये 2,400 ऐवजी रुपये 2,800 ग्रेड वेतन अदा केल्यामूळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती हदगांव, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती हदगांवचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 29,60,504/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.एस.आर.2013/प्र.क्र.30/आस्था-5,दिनांक 09/09/2014 अन्वये ग्रामसेवकांना दिनांक 20/05/2009 च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली रुपये 2,800/- ची तरतूद रदद करण्यात आली असून त्यांना दिनांक 01/10/2014 पासून रुपये 2,400/- ग्रेड वेतनाची तरतूद करण्यात आली असतांना एकूण 4 ग्रामसेवकांना रुपये 2,800/- ग्रेड वेतन दिल्याने रुपये 20,160/- अतिप्रदाने झाले आहे. सदर रक्कमेची वसूली व्हावी.

**4.64 ग्रामपंचायत सोनारी येथे जनसुविधा विशेष अनुदानातून स्मशानभूमी शेड बांधकामातील अनियमिततताबाबत.**

**पंचायत समिती भोकर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती भोकरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 3,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 अन्वये एका आर्थिक वर्षात मूक्त केलेला निधी पूढील आर्थिक वर्षात वापरण्यात येईल त्यानंतर अखर्चित निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. परंतू पंचायत समितीने सन 2012-13 चा निधी नियमबाहयरित्या सन 2014-2015 मध्ये वापरला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 177 (1) अन्वये स्मशानभूमी शेडचे प्रत्यक्षात पूर्ण झालेल्या बांधकामाचे मूल्यांकन करुन त्या-त्या प्रमाणात रक्कम अदा करणे आवश्यक होते परंतू पंचायत समितीने झालेल्या कामाची नोंद मोजमाप पुस्तकात घेवून मोजणीच्या नोंदीवरून बिल तयार न करता नियमबाहयरित्या अग्रीम मंजूर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 210 (ब) अन्वये गटविकास अधिकारी यांना रुपये 500/- पर्यंत अग्रीम देण्याचे अधिकार असतांना ग्रामपंचायतला रुपये 2,50,000/- चे अग्रीम नियमबाहयरित्या प्रदान केले आहे.

**4.65 ग्रामसेवकांना 2400 ऐवजी 2800 ग्रेड वेतन अदा केल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती लोहा सन 12-13 ते 14-15 च्या लेखापरीक्षणात उक्त प्रमाणकाअन्वये आस्थापना II अंतर्गत ग्रामसेवकांच्या माहे जानेवारी 15 व फेब्रुवारी 15 च्या वेतनावर रुपये 24,45,609/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक डिएसआर 2013/प्र.क्र.30/आस्था-5,दिनांक 09/09/2014 अन्वये ग्रामसेवकांना दिनांक 20/05/2009 च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली 2800/- रुपयांची तरतूद रद्द करण्यात आली असून ग्रेड वेतन 2400/- करण्यात आले आहे सदर नियम 01/10/2014 पासून लागू करण्यात आले आहे. असे असताना माहे जानेवारी 2015 व फेब्रुवारी 2015 च्या वेतनात ग्रामसेवकांना 2800 प्रमाणे ग्रेड वेतन अदा करण्यात आलेले आहे.

2) 2400 प्रमाणे ग्रेड वेतन अदा करून जादा प्रदान झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

**4.66 ग्रामपंचायत किमान वेतन शासन निकषांचे पालन न करता 100 टक्के अनुदान प्रदान केल्यामूळे शासनाचे रुपये 59,43,575/- चे झालेल्या नुकसानी बाबत.**

**पंचायत समिती उमरी, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिति उमरीचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 26,24,600/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहे 12/2014 ते 02/2015 या कालावधीतील एकूण 26,24,600/- रुपये चे एकूण 58 ग्रामपंचायतीना कर्मचारी किमान वेतन अदाईपोटी प्रदान केले आहे. याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हि.पी.एम.2012/प्र.क्र.235/पं.रा.-3,दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना किमान वेतन अनुदान मिळण्यासाठी व 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिस्स्यास पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत यांनी नियमप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे कराची फेरआकारणी व गतवर्षात सर्व कराच्या एकूण मागणीची 90 टक्के वसूली करणे बंधनकारक राहिल असे स्पष्ट केलेले असतांनाही पंचायत समिती उमरी अंतर्गत एकूण 58 ग्रामपंचायतची सन 2013-14 ची वसूली नियमांप्रमाणे नसतांना सरसकट 100 टक्के शासन अनुदान प्रदान केले आहे.

2) प्रमाणकाची तपासणी केली असता सुधारित आकृतिबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांना किमान वेतनाची रक्कम त्यांचया बँक खातेवर जमा करणे आवश्यक असताना असे न करता ग्रामपंचायतीचे एकुण 58 ग्रामपंचायतीचे खात्यात रक्कम रुपये 26,24,600/- जमा केलेली आहे. सदर बाब नियमबाहय आहे.

**4.67 एक स्तर वरीष्ठ चुकीची वेतन श्रेणी देणेबाबत.**

**पंचायत समिती माहुर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती माहुरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात प्राथमिक आरोग्य केंद्र आष्टा अंतर्गत् वेतन माहे जानेवारी व फेब्रुवारी च्या वेतनावर रक्कम रुपये 8,92,473/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वे.पु.र./1209/प्र.क्रमांक.27/सेवा-09, दिनांक 22/04/2009 अन्वये दिनांक 01/01/2006 पासून सुधारित वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतन निश्चीती बाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 प्रसिध्द करण्यात आलेले आहे. या परिपत्रकात आदिवासी भत्ता देणे बाबत निर्देशित करण्यात आलेले नाही.

2) आदिवासी भागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना एक स्तर पदोन्नती व अन्य सवलतींचा लाभ देणे बाबत शासन परीपत्रक क्रमांक वेतन-2013 प्र.क्र.116/आस्था-10 ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 17/04/2013 नुसार विचाराधिन असलेबाबत खुलासा केलेला आहे. तथापि उपरोक्त प्रकारचा भत्ता देण्यात आलेला नाही.

3) श्री. पी.आर. पवार कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असुन मुळ वेतन 7440+1900 अनुज्ञेय आहे. परंतु सदर कर्मचारी 10620+2150 वेतन आहरण करत आहे. सदरील वेतन श्रेणी चुकीची असुन सदर कर्मचा-यास देऊ केलेल्या दिनांकापासुन वेतन निश्चिती करुन दिलेल्या दिनांकापासुन परिगणना करुन जादा प्रदान रक्कम वसुल करुन जिल्हा निधीत भरणा करावी.

**4.68 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन शासन निकषांचे पालन न करता 100 टक्के अनुदान प्रदान केल्यामूळे शासनाचे रुपये 59,43,575/- चे झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती नायगांव (खै.), जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती नायगांव खै. चे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 59,43,575/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन माहे 11/2014 ते 01/2015 एकूण 81 ग्रामपंचातीना रुपये 59,43,375/- चे प्रदान दर्शविले याबाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक व्ही पी. एम.-2012/प्र.क्र.335/परा-3,दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाकडून किमान वेतन अनुदान मिळण्यासाठी व 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिस्स्यास पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे कराची फेरआकारणी व गत वर्षात सर्व कराच्या एकूण मागणीची 80 टक्के वसूली बंधनकारक असतांना नियमबाहयरित्या 100 टक्के निधी वाटप केला आहे.

2) सुधारित आकृतीबंधानुसार ग्रामंपचायत कर्मचा-यांना किमान वेतनाची रक्कम त्यांच्या बँक खातेवर जमा करणे आवश्यक असताना असे न करता एकूण 28 ग्रामपंचातीचे खाते रक्कम रुपये 9,50,275/- जमा केलेली आहे सदर बाब नियमबाहय आहे.

**4.69 ग्रामसेवक यांना रुपये 2,400/- ऐवजी रुपये 2,800/- ग्रेड वेतन देतांना झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती नायगांव (खै.), जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 52) -** पंचायत समिती नायगांव खै. चे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 1,25,860/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

माहे 10/2014 ते 02/2015 या कालावधीतील एकूण 29 ग्रामसेवकांना वेतनदेयकांतून रुपये 2,400/- ऐवजी रुपये 2,800/- चे ग्रेड वेतन दिल्याने एकूण 1,25,860/- चे अतिप्रदान झाले आहे. महाराष्ट्र महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक DSR 2013/ प्र.क्र.30/ आस्था-5/ दिनांक 09/09/2014 अन्वये ग्रामसेवकांना 2,400/- रुपये ग्रेड वेतन मंजूर असून त्याऐवजी जुलै - 2014 ते जानेवारी - 2015 दरम्यान 2,400/- ऐवजी 2,800/- रुपये ग्रेड वेतन निश्चिती केल्यामूळे जादा प्रदान रुपये 1,25,680/- झाले आहे.

**4.70 मोठ्या प्रमाणावर रद्द झालेल्या जनसुविधा योजनेअंतर्गत बांधकामाची अखर्चीत रक्कम शासनखाती भरणा न करणे व इतर गंभीर अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, उस्मानाबाद, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात सन 2010-2011 ते 2013-2014 या वित्तीय वर्षात जनसुविधा योजनेअंतर्गत 19 बांधकामावर रुपये 66,46,700/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक, संकीर्ण1002/प्र.क्र.128/ अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे ज्या वित्तीय वर्षात अनुदान वितरीत केलेले आहे, ती लगतच्या वित्तीय वर्षात वापर न झाल्यास शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, रद्द झालेल्या कामाची रक्कम रुपये 47,91,000/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) ग्रामपंचायतींना काम सुरु करण्यासाठी अग्रीम प्रदान केलेला आहे. तथापि, सदरची कामे रद्द केल्यामुळे ग्रामपंचायतींना प्रदान केलेली अग्रीमाची रक्कम रुपये 3,41,100/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) सन 2010-2011 या वित्तीय वर्षात मंजुरी प्राप्त झालेली स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे वडगाव (सि), ता. उस्मानाबाद व स्मशानभूमी शेड बांधकाम चिलवडी ही कामे आहे त्या स्थितीत अंतीम करण्यात आली त्यामुळे सदरील कामावर झालेला खर्च रुपये 2,22,500/- निष्फळ ठरला आहे. कामामधील अखर्चीत रक्कम रुपये 2,27,500/- व निष्फळ खर्चाची रक्कम रुपये 2,22,500/- अशी एकूण रक्कम रुपये 4,50,000/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) सन 2011-2012 मध्ये मंजुर असलेले स्मशानभुमी शेड बांधकाम पोहनेर या कामासाठी गामपंचायतला रक्कम रुपये 2,64,000/- अग्रीम प्रदान करुनही सदरचे काम ग्रामपंचायतीने सुरु केलेले नाही. प्रदान अग्रीम रक्कम रुपये 2,64,000/- वसुल करून व सदरील कामाची अखर्चीत रक्कम रुपये 36,000/- अशी एकूण रक्कम रुपये 3,00,000/- शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

5) सन 2011-2012 व सन 2012-2013 या वित्तीय वर्षात मंजूरी प्राप्त कामापैकी 4 कामे अपूर्ण आहेत. सदरील अपूर्ण कामे पूर्ण करणे अन्यथा खर्च रक्कम रुपये 11,05,700/- सह सदर कामासाठी प्राप्त अनुदान शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95(2)(ग) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व कलम 98(2)(घ) नुसार गट विकास अधिकारी यांनी सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

7) पंचायत समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 244 अन्वये नमुना नंबर 90 अनुदान नोंदवही ठेवलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.71 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन अनुदानामध्ये जादा रक्कम प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती लातूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम 61 प्रमाणे ग्रामपंचायतीला त्यांच्या आवश्यकते प्रमाणे कर्मचारी नेमण्याचे व त्यांचे वेतन ठरविण्याचे अधिकार आहेत. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक 21/01/2000 च्या शासन निर्णयान्वये लोकसंख्या निहाय ग्रामपंचायतीचा आकृतिबंध निश्चित करण्यात आलेला असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या किमान वेतनासाठी जो खर्च येईल त्यातील काही हिस्सा गावाच्या लोकसंख्येनुसार व ग्रामपंचायत स्वउत्पन्नानुसार अनुदान स्वरुपात शासनाकडून देण्यात येतो. त्यावर रुपये 61,53,500/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएमम-2012/प्र.क्र.235/पंरा-3, दिनांक 04/03/2014 नुसार खाली नमूद केलेल्या दराने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यास किमान वेतन देण्यात येते.

पंचायत समिती लातूर ने सदरील अनुदान देताना फक्त गावाची लोकसंख्या विचारात घेतलेली असून ग्रामपंचायतीचे उत्पन्न विचारात घेतलेले नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 02, दिनांक 09/12/2015 अन्वये सन 2013-14 ची ग्रामपंचायत निहाय स्वउत्पन्नाची माहिती मागितली असता सदरील माहिती सादर केलेली नाही. प्रियासॉफ्ट (www.accountingonline.gov.in) अहवाला नुसार सन 2013-14 चे ग्रामपंचायत स्वउत्पन्नाची माहिती काढण्यात आली असून सदरील माहितीवरून ग्रामपंचायतीस जादा प्रदान रुपये 3,64,650/- झाल्याचे दिसून येते. वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम 2012/प्र.क्र.235/पंरा-3,दिनांक 04/03/2014 नुसार वर नमूद केलेल्या वर्गवारीतील 100 टक्के व 75 टक्के प्रमाणे वाढीव हिश्यांस पात्र होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे फेर आकारणी करणे व सन 2013-14 च्या वर्षाची एकूण वसुली 80 टक्के करणे बंधनकारक राहील. परंतु पंचायत समितीने या अटींची पूर्ततेची खात्री न करता रक्कमेचे प्रदान केलेले आहे. बंधनकारक अटीची पूर्तता न करणाऱ्या ग्रामपंचायतीस 50 टक्के प्रमाणेच अनुदान देय आहे. रुपये 3,42,650/- जादा प्रदान झाले आहे. वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम2699/प्र.क्र.206(1) 21,दिनांक 21/01/2000 नुसार ग्रामपंचायतीने प्रथम दरमहा आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना किमान वेतन देतील व त्यानंतर शासन हिश्याच्या रक्कमेची प्रतिपूर्ती म्हणून देण्यात येईल. परंतु पंचायत समितीने अशा प्रकारचा आढावा न घेता रक्कमेचे प्रदान केलेले आहे.

**4.72 श्री.माने गणपत बंकट परिचर पंचायत समिती औसा यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर अनुकंपा तत्वावर चुकीच्या पद्धतीने नेमणूक दिलेबाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** श्री.माने गणपत बंकट यांच्या नियुक्तीबाबत पुढील प्रमाणे अनियमितता झाल्याबाबत नमूद करता येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. माने गणपत बंकट यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांचे आदेश क्रमांक जिपला/ साप्रवि/ कार्या-7/अकपा/सक 30/कावी/427,दिनांक 31/06/2012 अन्वये ते बी.ए. पास असल्याने परिचर या पदावर अनुकंपा तत्वावर आयुर्वेदीक दवाखाना देवताळा येथे नियुक्ती करण्यात आली.

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा/1095/प्रक्र34-अ/आठ,दिनांक 23/08/1996 मधील अट क्र. 4 अन्वये गट क मधील पदावर अनुकंपा तत्वावर पात्र असणाऱ्या व्यक्तीला पदाच्या उपलब्धते अभावी गट ड मधील पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट क मधील पदावर त्यांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. परंतु गट ड मधील पदावर नियुक्ती अनुकंपा योजने अन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा आणि तसे केले असेल तर गट क पदावर नियुक्ती देण्यात येईल असे आदेश आहेत परंतु श्री. माने गणपत बंकट यांच्या परिचर पदावरील नियुक्तीच्या आदेशात अशा प्रकारची अट घातलेली नव्हती.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांचे आदेश जा.क्र.जिपला/साप वि/कार्या-7/अकपा/सं.क26/कावि,437,दिनांक 28/07/2014 अन्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर अनुकंपा तत्वावर पंचायत समिती औसा येथे नेमणूक दिली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियमावली 1967 मधील परिशिष्ट 6 च्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर उमेदवार एस. एस. सी. व शासनाने विहित केलेली Asstt. to extension officer हि पदविका पास असणे आवश्यक आहे. परंतु श्री. माने गणपत बंकट हे प्रथम नेमणुकीच्या वेळी बी.ए पास होते व त्यांनी जि.प. सेवेत आल्यानंतर जुन 2013 मध्ये construction supervisor ही एक वर्षाची पदविकेची परीक्षा देऊन जिल्हा परिषद सेवेत आल्यानंतर एक वर्षाने पास झाले आहेत. त्यामुळे त्यांनी नियुक्तीच्या वेळी प्राप्त

शैक्षणिक पात्रतेनुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे नियम संगत होते परंतु जिल्हा परिषद सेवेत आल्यानंतर प्राप्त केलेल्या अहर्ते नुसार दिलेली नियुक्ती चुकीची आहे.

5) त्यांचे सेवा पुस्तकाची पाहणी केली असता ते पंचायत समिती औसा येथे केंव्हा रुजू झाले. तसेच गट क मध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्यांची शैक्षणिक अहर्तेची प्रमाणपत्रे कार्यालयात असणे त्या प्रमाणे त्यांची शारीरीक तपासणी करून घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केलेली नाही

6) उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथील रिट क्र.233/2012,दिनांक 20/01/2012 यांच्या निर्णयानुसार ज्या व्यक्ती गट क पात्रता धारण करीत आहे व त्यांना गट ड मध्ये नेमणूक दिलेली आहे अशा व्यक्तींना केवळ त्यांच्या आदेशात शासन निर्णय क्रमांक 23 दिनांक 23/08/1996 नुसार केवळ अट न टाकल्यामुळे त्यंचा हक्क हिरावून घेता येणार नाही तथापि गट क मध्ये नेमणूक साठी पात्र असणारी अहर्ता प्राप्त असणे आवश्यक आहे.

7) श्री. माने गणपत बंकट हे अनुकंपा तत्वावर नियुक्ती वेळी धारण केलेली शैक्षणिक पात्रता जी आहे त्या अनुषंगाने त्यांना गट क मधील पद देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी नंतर धारण केलेली शैक्षणिक अहर्तेवर तांत्रिक पदावर दिलेली नियुक्ती चुकीची असून ते सदर पदावर रुजू झालेल्या तारखेपासून म्हणजे दिनांक 01/08/2014 पासून ज्यादा अदायीची वसुली करून सबंधीतास नियमानुसार अनुकंपाच्या नियुक्तीच्या वेळी पात्र अहर्ता नुसार पूर्वपदावर नियुक्त करावे व तसे पूर्तता दर्शवावी.

8) सन 2013-14 च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. 4 मध्ये सदरील अनियमिततेबाबत आक्षेप नोंदवूनही याबाबत पंचायत समितीने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**4.73 सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता यांचे चार महिन्याचे दुबार रक्कम प्रदान केलेबाबत.**

**पंचायत समिती चाकूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, चाकूर चे सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता च्या अभिलेख्याची तपासणी करत असताना असे निदर्शनास आले कि, जून 2013 व मे ते जुलै 2014 या चार महिन्याचे सरपंच मानधन दुबार अदा झालेले असून मार्च 2014 व मे ते जुलै 2014 या चार महिन्याचे सदस्य बैठक भत्ता दुबार अदा झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती चाकूरने सदरील अनुदान उपरोक्त दराने 75 टक्के शासन अनुदान दिलेले आहे. जुन 2013 चे सरपंच मानधन प्रमाणक क्रमांक 142, दिनांक 28/03/2014 अन्वये प्रदान केले असून प्रमाणक क्रमांक 383,दिनांक 30/03/2014 अन्वये रक्कम रुपये 25,350/- दुबार प्रदान केलेले आहे. तसेच माहे मे ते जुलै 2014 या तीन महिन्याचे सरपंच मानधन प्रमाणक क्रमांक 28, दिनांक 01/10/2014 अन्वये प्रदान केले असुन प्रमाणक क्रमांक 135, दिनांक 31/03/2014 अन्वये रक्कम रुपये 76,050/- दुबार प्रदान केलेले आहे. तरी सरपंच मानधनाची दुबार प्रदान रक्कम रुपये 1,01,400/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

2) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2009/प्र.कर.125/पंरा-03,दिनांक 27/07/2009 नुसार पंचायत समिती चाकूरने सदरील अनुदान उपरोक्त दराने 75 टक्के शासन अनुदान दिलेले आहे. मार्च 2014 चे सदस्य बैठक भत्ता प्रमाणक क्रमांक 142,दिनांक 28/03/2014 अन्वये रक्कम रुपये 15,150/- प्रदान केलेले आहे. तसेच माहे मे, जुन, जुलै या तीन महिन्याचे सदस्य बैठक भत्ता प्रमाणक क्रमांक 135, दिनांक 31/03/2014 अन्वये रक्कम रुपये 45,450/- दुबार प्रदान केले आहे. तरी सदस्य भत्त्याची जदा प्रदानाची रक्कम रुपये 60,600/- वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2011/प्र.क्र.40/पंरा-03,दिनांक 06/09/2014 नुसार सरपंच मानधन व ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्त्यांचे दर सुधारित केले असून सदरील सुधारित दर दिनांक 15 ऑगस्ट 2014 पासून लागू केलेले आहेत. परंतु पंचायत समितीने सप्टेंबर 2014 पर्यंत जुन्याच दराने रकमेचे प्रदान केलेले आहे.

4) अर्ध समास पत्र क्रमांक 62, दिनांक 30/11/2015 नुसार संबधित अनियमिततेबाबत विचारणा केली असता याबाबत विभागाने कोणताही खुलासा दिलेला नाही. तरी दुबार प्रदान केलेल्या रकमेबाबत संबधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.